# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## दिनांक १५/०३/२०१३ रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत ठरल्याप्रमाणे स्विकृत करावयाचे उपविधी

## १. प्रास्ताविक

(१) **बँकेचे नांव मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, (Mumbai District Central Co-operative Bank Ltd.)** असे राहील. आणि सदर संस्थेची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नोंदणी क्र.BOM / BNK / ४० / १९७४ दिनांक ०६ ऑगस्ट १९७४ अन्वये झाली आहे. तसेच या बँकेला भारतीय रिझर्व्ह बँकेकडून बँकिंग व्यवसाय करणे करीता परवाना प्राप्त झालेला आहे. परवाना क्र. RPCD (MRO) .१२५३ / १८. ०१. ०३८ / २०११-१२ दिनांक डिसेंबर २० २०११ (REF: Lic: No ACD MH - १८C दिनांक जानेवारी ८ १९७५) आहे. बँकेच्या नोंदलेल्या कचेरीचे स्थलांतर झाल्यास अशा स्थलांतराची लेखी सुचना १४ दिवसांच्या आत नोंदणी अधिकारी यांना दिली जाईल. बँकेची मुख्य कचेरी मुंबई बँक भवन,२०७,डॉ.दादाभाई नौरोजी रोड, फोर्ट, मुंबई ४०० ००१ या नोंदलेल्या पत्यावर राहील. बँकेचे कार्यक्षेत्र बृहन्मुंबईतील जिल्ह्यापुरते मर्यादित राहील.

(२) **व्याख्या :-**

**१) कायदा म्हणजे महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था कायदा १९६० व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या दुरूस्त्या होय.**

**२) नियम म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा अधिनियम १९६० अंतर्गत केलेले महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या दुरूस्त्या होय.**

**३) निबंधक म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये नेमण्यात आलेले सहकारी संस्थांचे निबंधक ही व्यक्ती होय.**

**४) उपविधी म्हणजे बँकेचे सध्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार अस्तित्वात असलेले नोंदणीकृत उपविधी व त्यामध्ये वेळोवेळी अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार नोंदणीकृत केलेल्या दुरूस्त्या.**

**५) बोर्ड म्हणजे बँकेचे संचालक मंडळ होय.**

**६) सर्वसाधारण सभा म्हणजे बँकेची सर्व साधारण सभा यामध्ये विशेष सर्वसाधारण सभेचा देखील समावेश राहील.**

**७) मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणजे बँकेतील सर्वोच्च कार्यकारी अधिकारी. अशा अधिका-याचे पदनाम कार्यकारी संचालक , व्यवस्थापकीय संचालक, सरव्यवस्थापक, महाव्यवस्थापक यापैकी कोणतेही असू शकते. तसेच सदर अधिकारी हा बँकेचा पदसिध्द कार्यलक्षी संचालक असेल.**

८) व्यक्ती म्हणजे कोणतीही प्रौढ व्यक्ती जी इंडीयन कॉन्ट्रक्ट ॲक्ट १८७२ च्या कलम ११ नुसार करार करू शकते. तसेच स्वत:ची मालकी असलेली मालकी संस्था, भारतीय भागीदारी कायदा १९३२ नुसार नोंदणीकृत भागीदारी संस्था, अविभक्त हिंदु कुटुंब, राज्यसरकार, सार्वजनिक विश्वस्त संस्था किंवा इतर कोणत्याही प्रचलित कायद्यानुसार नोंदणीकृत असलेली संस्था अथवा कंपनी, संस्था नोंदणी कायदा १८६० नुसार नोंदणीकृत संस्था.

९) पदाधिकारी म्हणजे या बँकेच्या संचालक मंडळाने निवडलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी, अवसायक, प्रशासक अथवा अन्य अशी कोणतीही व्यक्ती जिची नियुक्ती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियमांतर्गत व बँकेच्या उपविधीनुसार बँकेचा व्यवसाय चालविण्यासाठी आदेश / मंजूरी देणारी व्यक्ती.

१०) सर्वसाधारण सभासद म्हणजे बँकेच्या नोंदणीसाठी करण्यात आलेल्या अर्जात सहभागी होणारी व्यक्ती अथवा नोंदणी नंतर कायदा , नियम व उपविधीनुसार ज्याचे सभासदत्व स्विकारण्यात आलेले आहे अशी व्यक्ती.

११) नाममात्र सभासद म्हणजे सदर उपविधीतील तरतूदीनुसार ज्या व्यक्तीचे सभासदत्व स्विकारले आहे अशी व्यक्ती.

१२) क्रियाशिल सभासद म्हणजे जी व्यक्ती या उपविधीतील तरतुद क्रमांक ५ ब नुसार पात्रता धारण करीत असेल ती व्यक्ती.

१३) सहयोगी सभासद म्हणजे बँकेचे दुस-या सभासदाबरोबर संयुक्तपणे भाग धारण केलेली व्यक्ती. परंतु अशा व्यक्तीचे नाव भाग प्रमाणपत्रावर पहिले असणार नाही.

१४) सहकारी संस्था म्हणजे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाव्दारे नोंदणी करण्यात आलेली संस्था.

१५) फेडरल सहकारी संस्था म्हणजे सहकारी संस्था अधिनियमांतर्गत नोंदविण्यात आलेली संगीय संस्था कि जीचे सभासदत्व सहकारी संस्था असतील.

१६) सहकारी बँक म्हणजे जी सहकारी संस्था बँकींग व्यवसाय करते व जिची नोंदणी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार झालेली आहे आणि किंवा जी संस्था बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ (A.A.C.S.) नुसार परवाना प्राप्त आहे अशी संस्था होय.

१७) रिझर्व्ह बँक म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक जी आरबीआय ॲक्ट १९३४ **(2 of 1934)** नुसार स्थापित करण्यात आली आहे.

१८) डिपॉझिट इंन्शुरन्स कार्पोरेशन म्हणजे डिपॉझिट इंन्शुरन्स व क्रेडिट गॅरेंटी कार्पोरेशन होय. जे डिपॉझिट इंन्शुरन्स कार्पोरेशन ॲक्ट १९६१ चे कलम ३ अन्वये स्थापित करण्यात आले आहे.

१९) थकबाकीदार म्हणजे सतत ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरीता कर्ज थकीत असणारी कर्जदार व्यक्ती / संलग्न सहकारी संस्था तसेच सदर कर्जास जामिन असणारी व्यक्ती.

२०) विलफुल डिफॉल्टर म्हणजे जो सभासद भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार व त्यामध्ये वेळोवेळी करण्यात येणा-या बदलांनुसार थकबाकीदार आहे अशी व्यक्ती.

२१) सहकार वर्ष म्हणजे १ एप्रिल ते ३१ मार्च मधील कालावधी.

२२) कार्यक्षेत्र म्हणजे संस्थेच्या नोंदणीच्या वेळी अथवा त्यानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने बँकींग व्यवसाय करण्यास मान्यता दिलेले भौगोलिक क्षेत्र.

२३) सहकारी तत्वे म्हणजे आंतरराष्ट्रीय / देश पातळीवर / राज्य पातळीवर वेळोवेळी जाहिर केलेली सहकाराची तत्वे होय.

२४) राज्य सरकार म्हणजे महाराष्ट्र राज्याचे शासन होय.

२५) सेवक म्हणजे बँकेच्या सेवेमध्ये कायम स्वरुपी कार्यरत असलेली व्यक्ती.

२६) नोटीफिकेशन म्हणजे केंद्र व राज्य सरकारच्या अधिकृत गॅझेटमध्ये तसेच भारतीय रिझर्व्ह बँक अथवा राष्ट्रीय कृषी व ग्रामीण बँकेतर्फे प्रसिध्द झालेले नोटीफिकेशन.

२७) बँक म्हणजे मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित होय.

२८) बी आर ॲक्ट म्हणजे बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ (A.A.C.S.)

२९) तज्ञ संचालक म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँकेच्या फिट व प्रॉपर मार्गदर्शक तत्वानुसार अर्हता धारण करणारी व्यक्ती.

३०) कार्यलक्षी संचालक म्हणजे बँकेने उपविधीतील तरतुदीनुसार व भारतीय रिझर्व्ह बँकेच्या फिट ॲण्ड प्रॉपर तरतूदीनुसार नियुक्त केलेला मुख्य कार्यकारी अधिकारी / महाव्यवस्थापक / कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक होय.

## २. उद्देश

बँकेचे उद्देश खालील प्रमाणे रहातील.

१) बँकेस संलग्न असलेल्या सहकारी संस्थांबरोबर सर्वसाधारणपणे बँकींगचे व्यवहार करणे.

२) महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० (सहकारी कायदा ) अन्वये नोंदविल्या गेलेल्या प्राथमिक पतपेढया, विविध कार्यकारी, संघीय संस्था अगर अन्य प्रकारच्या सहकारी संस्थांच्या भागभांडवलात भागीदारी स्विकारणे.

३) बँकेस संलग्न असलेल्या कर्जदार सहकारी संस्थांवर देखरेख ठेवणे तसेच सहकारी संस्था/सहकार क्षेत्राबाहेरील अन्य कर्जदार यांचेवर देखरेख ठेवणे,त्यांची तपासणी करणे व पतमर्यादा ठरविणे.

४) सहकारी संस्थांच्या जादा पैशाचा समतोल राखणारे जिल्हयाचे केंद्र म्हणून कार्य करणे.

५) आर.बी.आय. व नाबार्ड यांचे धोरणानुसार

अ) बँकेच्या कार्यक्षेत्रातील शेतकी, बिगर शेतकी वगैरे सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करणे.

ब) व्यक्ती, भागीदारी संस्था, कंपन्या, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था,कृषि उत्पन्न बाजार समित्या, सार्वजनिक न्यास, अधिकृत स्वयंसहाय्यता बचत समुह अधिकृत बचत गट (बचत गट ) इत्यादीना कर्ज पुरवठा करणे.

६) बँकेच्या संचालक मंडळाने वेळोवेळी तयार केलेल्या नियमांस अनूसरुन बँकेच्या साधारण तसेच नाममात्र सभासदास सोन्याचे व चांदीचे दागिने,मान्य सरकारी अगर विश्वस्त कर्जरोखे,राष्ट्रीय बचत योजनेतील प्रमाणपत्र,या बँकेच्या मुदत ठेव पावत्या तसेच आवर्तक ठेवीच्या तारणावर कर्ज देणे.

७) बँकेस संलग्न असलेल्या कर्जदार सहकारी संस्थांकडील येणेबाकी व थकबाकी वसुली सुकर होण्याकरिता सिक्युरिटायझेशन ॲक्ट खाली, सहकारी कायदा व त्याखालील नियमामधील तरतूदीनुसार व मा.नोंदणी अधिकारी यांनी घालून दिलेल्या अटीनुसार अशा संस्थांच्या विसर्जनाचे काम पत्करणे व सहकारी कायदा व त्याखालील नियमांन्वये ज्या कर्जदार संस्थेचे व्यवस्थापक मंडळ निष्प्रभावित केले आहे अशा संस्थांचा कारभार बँकेच्या अधिका-यांमार्फत / पदाधिका-यांमार्फत हाती घेणे.

८) आर.बी.आय. व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सभासदांचे व बिगर सभासदांचे जीवनमान व्यवसाय व उत्पादन यात सुधारणा घडवून आणणारे कोणतेही अन्य व्यवहार करणे, व्यवसाय विकास आराखडा तयार करणे.

९) बँकेच्या जादा निधीची कायदेशीर गुंतवणूक रिझर्व्ह बँक, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, व्यापारी बँकांच्या ठेवीमध्ये गुंतवणूक करणे व सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट मध्ये गुंतवणूक करणे, सार्वजनिक उपक्रमाचे कर्जरोखे, अखिल भारतीय आर्थिक संस्थांचे कर्जरोखे व कमर्शियल पेपर्समध्ये, सरकारी वचनचिठ्ठया, कर्जरोखे, म्युनिसिपल, जिल्हापरिषद व पोर्ट ट्रस्ट बॉडस्, डिबेंचर्स इत्यादी मध्ये गुंतवणूक करणे, तसेच बँकेचे सभासद अगर ठेवीदाराकरिता कोणत्याही प्रकारची आर्थिक जबाबदारी न घेता वरील बाबींची खरेदी-विक्री, हस्तांतर, बेचन अगर तारण ठेवणे इत्यादी व्यवहार करणे, अशा व्यवहाराशी अनुषंगिक अशी कोणत्याही प्रकारची आर्थिक जबाबदारी न घेता खरेदी-विक्री, हस्तांतरण, बेचन अगर तारण ठेवणे, व्यवहार करणे.

१०) बँकेच्या संचालक मंडळाने घालून दिलेल्या व रिझर्व्ह बँक यांनी मान्य केलेल्या नियमांनुसार आंतरदेशीय हुंडी (हुंडया) आणि इतर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस काढणे, स्विकारणे,बेचन करणे/ विकणे. इलेक्ट्रॉनिक मोडस ऑफ फंड ट्रान्सफर करणे.

११) बँकेने आणि निधीच्या सभासदाने द्यावयाच्या वर्गणीसंबंधी संचालक मंडळाने नियम तयार करणे,व सेवकांच्या हिताकरिता निधी उभारणे,अशा निधीस उत्तेजन देणे / सहाय्य करणे. तसेच बँकेतील आपदग्रस्त सेवकांकरिता आपदग्रस्त निधी उभारणे व सहाय्य करणे.

१२) बँकेचे उद्देश कार्यवाहीत आणण्यासाठी आणि इतर बँकांच्या, संस्थांच्या व ग्राहकांच्या वतीने काही विशिष्ट व्यवहार करण्याकरिता नाबार्डच्या धोरणानुसार बँकेचे कार्यक्षेत्रामध्ये सोयीस्कर ठिकाणी बँकेच्या शाखा, विस्तारकक्ष व ATM, KIOSK उघडणे. तसेच बिझनेस करसपॉन्डस नेमणे व फॅसिलिटेडर नेमणे.

१३) आर.बी.आय. व नाबार्ड यांचे धोरणानुसार सहकारी संस्थांव्यतिरिक्त इतर संस्थांना, व्यक्तींना , खाजगी व सार्वजनिक कंपन्यांना तसेच सार्वजनिक ट्रस्ट यांना कर्ज पुरवठा करणे.

१४) सहकारी चळवळीच्या उद्देशाने प्रचार करणे व सहकारी वाङ्मयाचे वाचनालय ठेवणे व चालविणे, बँकेचे खातेदार, ग्राहक, संलग्न सभासद तसेच कर्मचारी प्रशिक्षणासाठी तसेच जिल्हयातील सहकारी यंत्रणा बळकट करण्यासाठी सहकारी व्यवस्थापन व विकास संशोधन केंद्र चालविणे.

१५) रिझर्व्ह बँक/नाबार्ड यांचे धोरणानुसार शासनाच्या वेगवेगळया योजनांतर्गत पतपुरवठयाचे काम करणे.

१६) पुरेसे तारण घेऊन सरकारी आयात परवाना असलेली यंत्रसामुग्री,अवजारे,खते आणि इतर आवश्यक मालाच्या सामुग्रीसंबंधी पतपत्राची हमी देणे,अगर वरील प्रकारच्या मालाच्या सामुग्रीची खरेदी किंमत दिली जाण्याबाबतची हमी घेणे.

१७)

अ) विमा कंपनीचे दलाल म्हणून काम करणे आणि पैसे,कर्जरोखे किंवा तिचे तत्समचे व्यवहार बँक व विमा कंपनी यांनी एकमेकांशी संमत केलेल्या अटी, शर्ती व पध्दतीप्रमाणे करणे.

ब) शासकीय मुद्रांक फ्रँकिंग, शासकीय/ स्थानिक स्वराज्य संस्थांची कर बिले स्विकारणे इ. सुविधा उपलब्ध करुन देणे.

१८) कोणत्याही संस्थेशी सहकारी कायदा कलम २० ला पात्र राहून व्यवसाय करण्याकरिता भागीदारी करणे.

१९) बँकेच्या सेवकांना सायकल,मोटार सायकल,मोटार अगर तत्सम अन्य वाहन खरेदीसाठी तसेच अन्य कारणाकरिता मा.संचालक मंडळ वेळोवेळी जे नियम तयार करील त्या नियमास व अटीस पात्र राहून अर्थसहाय्य करणे.

२०) बँकेच्या सेवकांना घरखरेदी, फ्लॅट खरेदी, घरबांधणी, प्लॉट बांधणी, घर / फ्लॅट च्या मोठया दुरुस्तीसाठी वाहन खरेदी, कॅश क्रेडिट, ग्राहकोपयोगी वस्तू खरेदी करणेसाठी (ग्राहकोपयोगी वस्तू, शैक्षणिक खर्च, मुलीचे लग्न, मेजर ऑपरेशन) इत्यादी कारणांसाठी मा.संचालक मंडळ वेळोवेळी जे नियम तयार करील त्या नियमास व अटीस पात्र राहून कर्जपुरवठा करणे. मात्र अशा मंजुर केलेल्या कर्जाची एकूण येणेबाकी बँकेच्या एकूण ठेवीच्या जास्तीत जास्त ४% रक्कमे इतपत राहील.

२१) बँकेच्या शाखा कार्यालयासाठी व तसेच बँकेच्या सेवकांना राहण्यासाठी नवीन इमारती बांधणे, इमारती बांधण्यासाठी जागा खरेदी करणे,मालकी हक्क तत्वावर गाळा खरेदी करणे,भाडेपटट्याने (लीजने) घेणे तसेच इमारत खरेदी करणे व भाडयाने घेणे इ.बँकिंग रेग्युलेशन ॲक्टचे कलम ६ व ९ चे अधिन राहून सदर बाबी करता येतील.

२२) बँकेच्या व्यक्तीगत खातेदार तसेच संलग्न संस्था यांचेवतीने यथोचीत तारणावर बँक गॅरंटी देणे तसेच बँकेच्या खातेदारांना पतदारी प्रमाणपत्र (सॉलव्हन्सी सर्टीफिकेट) देणे.

२३) विशिष्ट प्रकारच्या पतपुरवठयाचे संदर्भात शिखर बँक आणि/अगर अन्य बँकेच्या समवेत जिल्हयातील/जिल्हयाबाहेरील सहकारी संस्था/अन्य यंत्रणा सहभाग तत्वावर कर्जपुरवठा (कन्सोर्टीयम फायनान्स) करण्यासाठी निधीची गुंतवणूक करणे तसेच आवश्यक असल्यास लीड बँक म्हणून काम करणे.

२४) या सर्व अगर त्यापैकी कोणत्याही कारणाकरिता चालू,बचत,मुदत अगर तत्सम खात्यावर ठेवी स्वीकारणे व पैसा उभारणे आणि वरील उद्देश साध्य होण्यासाठी सर्वसाधारणपणे आवश्यक व योग्य त्या सर्व गोष्टी करणे.

२५) बँक कर्ज देणे रक्कमेपेक्षा सभासद येणे रक्कम कमी आहे अशा आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या संस्था सभासद प्राथमिक शेतकी सहकारी संस्थांना आर्थिक मदत देण्यासाठी निव्वळ नफ्यातून निधी उभारणे व अशा निधीच्या विनियोगासाठी संचालक मंडळाने केलेल्या नियमानुसार कार्यवाही करणे.

२६) विविध शासकीय महामंडळे,स्थानिक स्वराज्य संस्था व इतर कंपन्यांच्या बिलांच्या वसुलीची कामे करणे व करार मदार करणे.

२७) भारतीय रिझर्व्ह बँक व राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या / करण्यात येणा-या मार्गदर्शक सुचनांनूसार / परवान्यांनुसार नुसार व्यवसाय करणे.

२८) सभासद, ठेवीदार, ग्राहक , विश्वस्त संस्था, बँका, सहयोगी संस्था, यांना तांत्रिक, आर्थिक , कायदे विषयक, सांख्यिकिय सेवा रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीने पुरविणे.

२९) रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीने एक किंवा अधिक सहयोगी संस्था वेळोवेळी अस्तित्वात असणा-या कायद्यानुसार स्थापन करणे.

३०) रिझर्व्ह बँकेच्या पूर्व परवानगीने व्यापारी बँकींग तसेच डी मॅट सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून देणे.

३१) रिझर्व्ह बँकेच्या परवानगीने क्रेडिट , डेबिट कार्डाचा व्यवसाय करणे.

३२) रिझर्व्ह बँकेच्या व निबंधकांच्या पूर्व परवानगीने इतर बँका, सहकारी बँका या बँकेत संमिलित करून घेणे.

३३) बँकेच्या व्यवसायात वृध्दी होण्याच्या दृष्टीकोनातून भारतीय रिझर्व्ह बँकेच्या , भारतीय कृषी व ग्रामीण विकास बँकेच्या पूर्व परवानगीने इतर संलग्न व्यवसाय करणे.

वरील उद्देश साध्य करण्याकरिता व त्या अनुषंगाने आवश्यक ती कामे करणे व सर्वसाधारणपणे जिल्हयातील सहकारी संघटनेस व वाढीस उत्तेजन व सहाय्य देणेकरिता आवश्यक अशी सर्व कामे करणे.

## ३.निधी उभारणीचे स्त्रोत

(३) बँकेचे अधिकृत भागभांडवल **रु.२००.०० कोटी (रुपये दोनशे कोटी मात्र )** असेल ते रु.१०००/- च्या २०,००,००० भागात विभागलेले राहील. भाग मागणी अर्जासोबत प्रत्येक भागाचे रु.१०००/- रुपये इतकी किंमत राहील. महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मुंबईने पुरविलेल्या भाग भांडवल सहकारी कायद्यातील तरतूदीस पात्र राहून पूर्णतः अगर अंशतः परत देता येईल.

रु.५,००,००,०००/- प्रत्येकी रु.१०००/- चे ५०,०००/- "अ" वर्ग विमोचन/ परतफेड योग्य अधिमान/अग्रहक्क समभाग जे राज्य शासनास आणि/ अथवा राज्य सहकारी बँकेस वाटप करुन द्यावयाचे आहेत.

रु.१९४,००,००,०००/- प्रत्येक रु.१,०००/- चे १९,४०,०००/- 'ब' वर्ग समभाग जे बँकेच्या कार्यक्षेत्रामधील संस्थांना वाटप करुन द्यावयाचे आहेत.

रु.१,००,००,०००/- प्रत्येकी रु.१,०००/- चे रु.१०,०००/- 'क' वर्ग समभाग, जे बँकेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहणा-या व्यक्तिगत सभासदाना वाटप करुन द्यावयाचे आहे.

समभागाचे मूल्य समभागाकरीता असलेल्या अर्जासह एक रक्कमी भरणा करण्यात येईल. "अ" वर्गाचे समभाग केवळ राज्य शासनास आणि /अथवा राज्य सहकारी बँकेस अशा स्वतंत्र्यासह वाटप करुन देण्यात येतील की, वाटपाच्या तारखेपासून पाच वर्षाच्या कालावधी नंतर सदर समभागांचे मूल्य संपूर्णपणे किंवा भागामध्ये अशा शर्तीस अधिन राहून बँक परत करील की "ब" आणि "क" वर्गाच्या समभागाकरीता जो लाभांशाचा दर आहे. तोच लाभाशांचा दर "अ" वर्गाच्या भाग भांडवलास राहील. आणि शासनाद्वारे वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या अशा लाभांश दरापेक्षा जास्तीची कोणतीही रक्कम शासनाद्वारे विहित करण्यात येईल. त्याप्रमाणे सवलत आणि हमी निधीमध्ये जमा करण्यात येईल. शासनास अशाप्रकारे परत केलेले भाग भांडवल संस्थेद्वारे अभिदान देण्याकरीता खुले असेल.

४) **कर्ज काढण्याची मर्यादा** :- बँकेस ठेवीच्या रुपाने भांडवल उभारता येईल तथापी अशा भांडवलाची कमाल मर्यादा रिझर्व्ह बँक/नाबार्ड यांनी वेळोवळी विहित केलेल्या मर्यादे इतकी राहील. बँकेस रिझर्व्ह बँक / नाबार्ड यांचे धोरणानुसार कोणत्याही जॉईंट स्टॉक कंपन्या, बँका, राष्ट्रीयकृत बँका, याजकडून कॅश क्रेडिट, अधिकतम क्रेडिट कर्ज अगर ओव्हरड्राफ्ट घेण्याची व्यवस्था करता येईल. याकरिता दुय्यम तारण म्हणून मागणी केली गेल्यास बँकस संलग्न असलेल्या संस्थांनी दिलेले इंडियन ट्रस्ट ॲक्ट कलम २० खालील अभिप्रेत असलेले कर्जरोखे बॉंडस् अगर वचनचिठ्ठया संबंधीत संस्थांच्या संमत्तीने कर्ज देणा-या बँकेकडे वर्ग करता येईल.

५) बँकेतील एकूण बोजाचा विचार करता एकूण वसुल भाग भांडवलाच्या दुप्पटीइतक्या रक्कमेचे बँकेच्या मालकीचे आणि महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडे ठेवलेले इंडीयन ट्रस्ट ॲक्ट कलम २० खालील अभिप्रेत असलेले कर्जरोखे जमेस धरले जाणार नाहीत.

## ४. गुंतवणूक

**(६)** बँकेस कर्जात अगर अन्य बाबतीत न गुंतवलेला पैसा बँकेस महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ७० मध्ये विहित केल्यानुसार गुंतवता येईल.

## ५. सभासदत्व

**(७)** बँकेचे नोंदणी अर्जावर जिल्हयातील ज्या नोंदविलेल्या सहकारी संस्थांनी आपापल्या प्रतिनिधीमार्फत व व्यक्ती सभासदांनी सहया केल्या असतील अशा सर्व सहकारी संस्था व व्यक्ती बँकेच्या मुळ सभासद राहतील. बँकेच्या कार्यक्षेत्रात नोंदवली गेलेली प्रत्येक सहकारी संस्था, राज्य सहकारी बँक,जिल्हा परिषद, तत्सम संस्था,बँकेच्या सभासदत्वास पात्र राहतील.

**(८)** अ) बँकेच्या सभासदत्वाकरीता अर्ज करणा-या प्रत्येक नोंदविलेल्या सहकारी संस्थेने / कंपन्या / महामंडळे / स्थानिक स्वराज्य संस्था / न्यास / भागीदारी संस्था इत्यादींनी विहित नमूना "अे" मध्ये किमान **१ भाग** मिळण्याकरीता अर्ज केला पाहिजे.

**टिप :- नाबार्ड/ सहकार खात्याच्या सूचनांनुसार नवीन "व्यक्तिगत" सभासद म्हणून दाखल करुन घेता येणार नाही. तथापि महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ३० मधील तरतूदीनुसार व्यक्ति सभासद मृत्यु पावल्यास त्याच्या अधिकृत वारसास त्याचे भाग हस्तांतरीत करुन कायदेशीर प्रतिनिधीस बँकेचे व्यक्तिगत सदस्य म्हणून दाखल करुन घेता येईल.**

**(९)** अ) व्यक्तीने अगर सहकारी संस्थेने बँकेकडे भाग मागणी अर्ज करताना, अर्जासोबत मागणी केलेल्या भागांची संपूर्ण किंमत भरली पाहिजे.

ब) प्रत्येक व्यक्तीने अगर सहकारी संस्थेने / अन्य यंत्रणांनी सभासदत्वाकरीता बँकेकडे अर्ज करताना अर्जासोबत प्रवेश **शुल्क रु.१००/-** भरले पाहिजे.

**(१०)** बँकेची सभासद असलेली प्रत्येक सहकारी संस्था " संलग्न संस्था" म्हणून संबोधली जाईल.

**अ) व्यक्तिगत सदस्याच्या मृत्युनंतर हितसंबंधाचे हस्तांतरण :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील कलम ३० मधील तरतूदीनुसार संस्थेचा एखादा सदस्य मरण पावला असता, संस्थेने अशा सदस्याच्या मृत्यूच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत मयत सदस्याचा भाग किंवा हितसंबंध, नियमास अनुसरुन (मयत सदस्याने) त्यांचे पश्चात यासाठी नामनिर्दिष्ट व्यक्तिस किंवा अशी नेमणूक केली नसल्यास जी व्यक्ति मयत सदस्याची वारस किंवा कायदेशीर प्रतिनिधी आहे, त्यांचे नावे असे भाग किंवा हितसंबंध हस्तांतरीत करण्यांत येतील. मात्र अशा नेमलेल्या व्यक्तिस वारसास किंवा यथास्थिती कायदेशीर प्रतिनिधीस संस्थेचे सदस्य म्हणून दाखल करुन घेतले पाहिजे. तसेच या पोटकलमातील किंवा कलम २२ मधील कोणत्याही तरतूदीमुळे, अज्ञान किंवा वेडसर व्यक्तिला वारसाने किंवा अन्यथा मयत सभासदाचा संस्थेतील कोणताही भाग किंवा हितसंबंध संपादन करण्यास प्रत्यवाय असणार नाही.

**ब) व्यक्तिगत सभासदाचे भाग हस्तांतर करण्याची कार्यपध्दती.**

व्यक्तिगत सभासदाचे भाग महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ मधील नियम क्र.२४ मधील तरतूदीनुसार हस्तांतरीत करण्यांत येईल.

**(११)** व्यक्ती, भागदारी संस्था, कंपन्या, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यास इ. ना कर्ज पुरवठा करण्याचे दृष्टीने नाममात्र महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतूदीस पात्र राहून देता येईल.

**(१२)** सहकारी कायदा कलम २२ ला पात्र राहून व कलम २२ मध्ये निर्देश केलेल्या कोणत्याही व्यक्तीस बँकेचे सभासद होता येईल. मात्र -

(१) ज्या सभासदाचे बँकेचे अगर जिल्हयातील अन्य कोणत्याही संस्थेचे सभासदत्व काढून घेण्यात आले आहे. त्यास काढून टाकल्याच्या तारखेपासून एक वर्ष या बँकेचे सभासदत्व पुन्हा अगर नव्याने मिळणार नाही.

(२) दिवाळखोर अगर नादार ठरण्याकरीता अर्ज केलेला अगर ज्याचा निर्णय लागलेला नाही. असा दिवाळखोर अगर ज्याने न्यायालयाकडून दिवाळखोरीचे (नादारीचे) शिफारसपत्र मिळवले आहे अगर ज्याची शिक्षा रद्द झाली नाही व जो गुन्हा माफ झालेला नाही असा इसम या बँकेच्या सभासदत्वास पात्र राहणार नाही. मात्र शिक्षेची मुदत संपल्याच्या तारखेपासून पाच वर्ष उलटून गेली असल्यास वरील अपात्रता नष्ट होईल.

**(१३)** अ) नाममात्र सभासदास बँकेचे भाग धारण करावे लागणार नाहीत.पण त्यास रु.२००/- नाममात्र सभासद फी द्यावी लागेल. नाममात्र सभासदास निवडणूकीस उभे राहण्याचा व मतदानाचा अधिकार राहणार नाही. बँकेचा व्यवहार बंद करण्याची वेळ आल्यास त्याच्यावर त्याचेकडे असलेल्या बँक कर्जबाकी इतकी जबाबदारी राहील.

ब) नाममात्र सभासदांनी बँकेबरोबर केलेला संबंधित व्यवहार संपुष्टात आल्यावर अगर आणि संपुष्टात आणलेवर किंवा बँकेची येणे बाकी वसूल झाल्यानंतर त्याचे नाममात्र सभासदत्व आपोआप बंद झाले आहे असे समजण्यात येईल.

**(१४)** बँकेस संलग्न असलेल्या सहकारी संस्थांचे सभासदत्व अगर व्यक्ती सभासदत्व सहकारी कायदा कलम २५ यास पात्र राहून संपुष्टात येईल. मात्र त्यांच्याकडून बँकेस येणे असल्यास सर्व प्रकारच्या येण्याची (अपु-या भागपोटी येणे असलेली रक्कम वगळून) संपूर्ण फेड केल्याशिवाय कोणत्याही संस्थेचे अगर सभासदाचे सभासदत्व रद्द केले जाणार नाही.

**(१५)** बँकेस संलग्न असलेल्या संस्थेचे सभासदत्व सहकारी कायदा कलम ३५प्रमाणे रद्द करता येईल.

## ५ ब क्रियाशिल सभासद

बँकेच्या खालील बाबी पूर्ण करीत असलेले सभासद हे क्रियाशील सभासद असतील.

१) नागरी सहकारी बँका, पगारदार नोकरांच्या सहकारी पतसंस्था, नागरी सहकारी पतसंस्था, मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्था, प्राथमिक ग्राहक सहकारी संस्था, गृहनिर्माण सहकारी संस्था, मजूर सहकारी संस्था, महिला सहकारी संस्था, इतर सहकारी संस्था, औद्योगिक सहकारी संस्था आणि औद्योगिक वसाहती सहकारी संस्था, व्यक्तिगत सभासद क्रियाशील सभासदत्त्वासाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे राहतील -

अ) सदर सभासदाची बँकेच्या मागील सलग ५ वर्षातील किमान एका वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थिती असली पाहिजे. **(अनिवार्य)**

ब) सदर सभासदाने बँकेचे किमान रु.१,०००/- चा एक भाग धारण केले असले पाहिजे. **(अनिवार्य)**

क) व्यक्ती / संस्था हा / ही बँकेचा थकबाकीदार नसला पाहीजे. **(अनिवार्य)**

ड) उपरोक्त व्यतिरिक्त खालील चारपैकी एका बाबींची पूर्तता सहकारी संलग्न संस्थेने / व्यक्तिने केली पाहिजे

बँकेबरोबर सदर सभासदाचे मागील सलग ५ वर्षामध्ये किमान एक वेळा आर्थिक व्यवहार झाले असले पाहिजेत (सदर व्यवहार म्हणजे उदा.)

**१) बँकेमध्ये चालू / बचत / मुदत ठेवी किमान रु.१०००/- ठेव म्हणून मागील ५ वर्षामध्ये किमान १ वर्षासाठी तरी ठेवली पाहिजे. सदर ठेवीवर कोणत्याही प्रकारची कर्ज सुविधा घेता येणार नाही.**

**२) बँकेकडून मागील ५ वर्षात किमान एकदा किमान रु.१०,०००/- इतके कर्ज घेतले पाहीजे.**

**३) बँकेकडील लॉकर्स सुविधांचा मागील ५ वर्षात किमान १ वर्षाकरीता उपभोग घेतला पाहीजे.**

**४) सहकारी संस्थेचा संपूर्ण आर्थिक व्यवहार बँकेतील खात्यामार्फत केला पाहीजे.**

अशा क्रियाशील सभासदाची नोंद बँकेने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, यांनी सुचित केलेल्या विहित नमुन्यात ठेवावयाची आहे.

जो सदस्य वरील नमूद केलेल्या निकषाची पूर्तता करणार नाही. त्या सदस्याचे अक्रियाशिल सदस्य म्हणून वर्गीकरण करण्यात येईल. जेव्हा बँक एखाद्या सदस्याचे अक्रियाशिल सदस्य म्हणून वर्गीकरण करेल तेव्हा वित्तीय वर्ष समाप्त होण्याच्या दिनांकापासून ३० दिवसाच्या आत संबंधित सदस्याला अशा वर्गीकरणाबाबत विहित रितीने कळविल.

**मतदानाचा अधिकार -**

अ) क्रियाशिल सभासदासच संचालक मंडळ निवडणूकीमध्ये उभे राहण्याचा, भाग घेण्याचा व मतदानाचा अधिकार राहील.

ब) थकबाकीदार म्हणजे सतत ९० दिवसांपेक्षा अधिक कालावधीकरीता थकीत असणारी कर्जदार व्यक्ती / संलग्न संस्था, संस्थेचा प्रतिनिधी, सदस्य व संचालक तसेच सदर कर्जास जामिन असणारी व्यक्ती यांना मतदानाचा अधिकार असणार नाही.

## ६. भाग

**(१६)** अ) बिगर कर्जदार सभासदाव्यतिरिक्त प्रत्येक वैयक्तिक सभासदाला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतूदीनुसार कमाल भाग धारण करता येतील.

ब) बँकेने तिला संलग्न असलेल्या (सहकारी साखर कारखाने,नागरी सहकारी बँका,दुर्बल घटकांच्या तसेच मागासवर्गीयांच्या संस्था वगळून) सभासद संस्थेकडून तिला बँकेचे प्रत्यक्ष अदा केलेल्या एकूण कर्जाच्या जास्तीत जास्त ५% इतकी रक्कम नाबार्डचे सूचनेप्रमाणे भाग भांडवलापोटी गोळा केली पाहिजे. परंतु दुर्बल सभासदास पीक कर्ज तसेच सर्व प्रकारच्या मध्यम व दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या बाबतीत ही मर्यादा जास्तीत जास्त २.५% राहील आणि अशा रितीने संलग्न संस्थांकडून भागापोटी गोळा करावयाच्या रक्कमेची मर्यादा संपल्यावर त्या संस्थेकडून भागापोटी म्हणून रक्कम गोळा करता येणार नाही. मात्र अंतिम सभासदांकरिता कर्जपुरवठा घेणा-या सहकारी संस्थेच्या बाबतीत सहकारी खाते / रिझर्व्ह बँक / नाबार्ड यांच्या आदेशानुसार तिच्या सभासदांनी कर्जाच्या प्रमाणात धारण करावयाच्या कमाल संस्था भागाची रक्कम ५ टक्क्यापेक्षा कमी असल्यास याबाबतीत संमत करण्यात आलेल्या प्रमाणात संबंधीत संस्थेस बँक भागात गुंतवणूक करावी लागेल. दुर्बल घटकांच्या तसेच मागासवर्गीच्या सहकारी संस्थांनी त्यांना आदा केलेल्या एकूण कर्जाच्या २.५% बँक भागात गुंतवणूक करावी लागेल. कर्जदार साखर कारखान्यांनी कमाल कर्ज उचलीच्या जास्तीत जास्त १% इतके बँक भाग घेतले पाहिजे. कर्जदार नागरी सहकारी बँकांच्या बाबतीत बँक भाग धारण करण्याची मर्यादा कर्ज मंजुरीच्या १% राहील. असे असले तरी काही विशिष्ट परिस्थितीत विशिष्ट प्रकारच्या संस्थेच्या बाबतीत ठरवून दिलेली ५% ची मर्यादा कमी करण्याचा आणि अगर ही मर्यादा जास्त वाढविण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

**(१७)** अ) बँकेस राज्य सरकारला आपले भाग देता येतील,तथापी कोणत्याही परिस्थितीत शासनाचे भाग भांडवल बँकेच्या एकूण वसुल भाग भांडवलाच्या २५% पेक्षा जास्त असणार नाही.

ब) बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी बँक अथवा बँकेस वित्त पुरवठा करणा-या संस्थेस तसेच संघीय संस्थेस आपले भाग देता येतील.

क) बँकेस महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.च्या पोटनियमातील तरतूदीनुसार तिच्या संचालक मंडळावर आपल्या बँकेचा प्रतिनिधी म्हणून संचालक मंडळावरील सदस्याचीच-महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार निवड केली जाईल.

**(१८)** वैयक्तिक सभासदास त्याच्या पश्चात बँकेच्या भागावर व हितसंबंधावर हक्क सांगण्याकरीता बँकेच्या वैयक्तिक सभासदास वारस नेमण्याचा हक्क राहील.

**(१९)** अ) कोणत्याही कारणास्तव सभासदत्व रद्द केल्यास,संबंधीत सभासदास त्याने धारण केलेल्या बँकेच्या भागाची वसूल झालेली रक्कम त्याच्याकडील बँकेचे येणे असल्यास ते वजा जाता त्यास एक महिन्याच्या आत अदा केली जाईल. बँकेस संलग्न असलेल्या सहकारी संस्थेचे विसर्जन होत असल्यास,बँक भागाची रक्कम बँकेचे येणे वजा जाता संस्थेच्या विसर्जन अधिका-यास अदा केली जाईल.

ब) बँकेच्या वैयक्तिक सभासदास मृत्यू आल्यास **त्याने नेमलेल्या वारसाने सदर सभासदत्व हस्तांतरणास नकार दिल्यास** त्याने धारण केलेल्या बँकेच्या भागाच्या वसूल झालेल्या किंमतीतून बँकेचे येणे वसूल केले जाईल व उरलेली रक्कम त्याने नेमलेल्या वारसास आणि वारस नेमला नसल्यास बँकेच्या संचालक मंडळास योग्य वाटत असलेल्या वारसास अगर कायदेशीर प्रतिनिधीस अर्ज घेऊन संबंधीत सभासदाच्या मृत्यूच्या तारखेपासून सहा महिन्याच्या आत अदा केले जाईल. मयत वैयक्तिक सभासदाच्या नेमलेल्या वारसास अगर सभासदास बँकेकडून येणे असलेल्या सर्व रकमा न्यायालयाचा बंदी हुकूम नसल्यास,मयत वैयक्तिक सभासदाच्या अर्जदार कायदेशीर वारसास,नेमलेल्या वारसास अगर सभासदास बँकेकडून येणे असलेल्या सर्व रकमा सहा महिन्याच्या आत बँकेने अदा केल्या पाहिजेत.

**(२०)** किमान एक वर्ष धारण केलेचे बँकेचे भाग बँकेच्या संचालक मडळाच्या मान्यतेने,भाग धारण करणा-या सभासदाच्या नावावरुन खालीलप्रमाणे वर्ग करता येतील :-

१) अन्य सहकारी संस्थेच्या नावाने.

२) बँकेच्या सभासदत्वास पात्र असलेल्या व सभासद होण्यास राजी असलेल्या सहकारी संस्थेस सभासद करुन घेण्यास बँकेच्या संचालक मंडळाच्या अनुमतीने. मात्र बँकेस संलग्न असलेल्या कोणत्याही सहकारी संस्थेस अगर भागीदारास ,बँकेचे कर्जदार असेतोपर्यंत आपल्या मालकीचे भाग कोणत्याही प्रकारे हस्तांतर करता येणार नाहीत.

**(२१)** बँकेच्या प्रत्येक भाग-वर्गिकरणाची नोंद भागवर्ग नोंदवहीत झाली पाहिजे.अशा प्रत्येक भाग वर्गीकरणास फक्त रु.१००/- शुल्क (अधिक सेवा कर / शिक्षण कर ) पडेल. बँकेच्या भाग नोंदवहीत नोंद न झालेल्या कोणत्याही भागाची वर्गावर्गी अधिकृत समजली जाणार नाही.

**(२२)** बँकेच्या प्रत्येक सभासदास त्याने धारण केलेल्या भागाचा दाखला बँकेच्या अधिकृत मुद्रेनिशी बँकेकडून मिळण्याचा हक्क राहील. भाग दाखले हरवल्यास अगर जीर्ण झाल्यास,प्रत्येक भाग दाखल्यास रु.१००/- शुल्क (अधिक सेवा कर / शिक्षण कर ) घेऊन बँकेस नवीन भाग दाखले देता येतील.असे भाग दाखले तीन महिन्याच्या आत दिले पाहिजेत.

**(२३)** बँकेच्या देण्याबाबतची बँकेच्या भागधारकांची जबाबदारी त्यांनी धारण केलेल्या भागाच्या दर्शनी किंमतीपुरतीच मर्यादीत राहील.

## ७.साधारण सभा

**(२४)** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम आणि निवडणूक नियम तसेच बँकेचे पोटनियम यास पात्र राहून पाठविलेले संस्था प्रतिनिधी आणि व्यक्ती सभासदांचे प्रतिनिधी मिळून झालेल्या साधारण सभेकडे बँकेची अखेरची सत्ता राहील.विसर्जित/रद्द सहकारी संस्थांखेरीज इतर संलग्न सहकारी संस्थेस आपल्या सभासदांपैकी एक प्रतिनिधी पाठविता येईल. मात्र असा प्रतिनिधी त्या संस्थेचा सेवक नसावा.साधारण सभेस उपस्थित राहणा-या अशा प्रत्येक प्रतिनिधीस एक मत राहील.मात्र निवडणुकीपुरते त्याला त्याच्या प्रत्येक हुद्याच्या अधिकारास एक मत राहील. समान मताचे बाबतीत सभेच्या अध्यक्षास अधिकारपरत्वे एक जादा मत देण्याचा अधिकार राहील.व्यक्ती सभासदांच्या प्रतिनिधींच्या निवडणुकीसंबंधी बँकेचे संचालक मंडळ वेळोवेळी नियम घालून देईल.

**(२५)** अ) वार्षिक साधारण सभेच्या / आणि विशेष साधारण सभेच्या तारखेपूर्वी किमान १४ दिवस अगोदर मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक संचालक मंडळाच्या

आदेशावरुन साधारण सभेची / विशेष साधारण सभेची सूचना काढतील. सदरची सूचना पोस्टाने / कुरीअर सेवेने / समक्ष / **सभासदांच्या संमत्तीने e-mail** व्दारे भागधारकास, संलग्न संस्थांस रवाना केली जाईल. अशा त-हेने भागधारकाकडे, संलग्न संस्थांस रवाना केल्याचे पोस्टाचे / कुरिअर सेवेचे / समक्ष दिलेचे अधिकृत सर्टीफिकेट / पोच पत्र असल्यास ती सूचना भागधारकास, संलग्न संस्थांस मिळाली असे समजले जाईल. खालील तपशिल नमूद करुन सदरची सूचना किमान **एका**

**मराठी स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द केली जाईल :-**

१) सभेची जागा ही बँकेच्या मुख्यालयाच्या शहराच्या बाहेर असणार नाही.
२) सभेची तारीख
३) सभेची वेळ
४) सभेची विषयपत्रिका
५) पोटनियम २५ (ड) नुसार टिप

ब) प्रतिवर्षी ३१ मार्च नंतर लगेच आणि वार्षिक साधारण सभेपुर्वी शक्य तितक्या लवकर लगतच्या सालच्या ३१ मार्च पर्यंत बँकेचे सभासदत्व मिळालेले व्यक्ती सभासद व उल्लेख केलेल्या तारखेपर्यंत बँकेचे सभासदत्व मिळालेल्या संस्थांच्या संख्येच्या १/५ इतके व दर २५ व्यक्ती सभासदांमागे एक याप्रमाणे (अपुर्णांक सोडून) यापैकी जी संख्या कमी असेल तितके व्यक्ती प्रतिनिधी निवडतील. ३१ मार्च नंतर त्यांच्या जागी नवीन व्यक्ती प्रतिनिधी निवडून येईपर्यंत असे निवडून आलेले प्रतिनिधी व्यक्ती प्रतिनिधी म्हणून काम करतील. संपलेल्या लगतच्या सालाच्या ३१ मार्चपर्यंतचे व्यक्ती सभासद अस्तित्वात असलेल्या संस्था व निवडून द्यावयाचे व्यक्ती प्रतिनिधी यांची संख्या बँकेचे संचालक मंडळ जाहीर करील. सभासदत्व कमी झाल्यामुळे व्यक्ती प्रतिनिधी कोणाही व्यक्ती सभासदाची नेमणूक करुन भरतील.

क) संस्था प्रतिनिधी व व्यक्ती प्रतिनिधी यांच्या एकूण संख्येच्या १/५ किंवा २५ यातील जी संख्या कमी असेल ती वार्षिक आणि विशेष साधारण सभेकरिता गणसंख्या राहील मात्र कोणत्याही वेळी अशा सभेत व्यक्ती प्रतिनिधींची संख्या,संस्था प्रतिनिधीच्या संख्येच्या १/५ पेक्षा जास्त असल्यास १/५ ही संख्या हजर असलेल्या व्यक्ती प्रतिनिधीच्या नावाने चिठ्ठया टाकून ठरविली जाईल चिठ्ठया उचलण्याचे काम मुख्य कार्यकारी अधिकारी / कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक करतील. व्यक्ती प्रतिनिधीची निवडणूक होतांना निवडणूक नियमांस पात्र राहून व्यक्ती प्रतिनिधीची १/४ संख्या ठरवण्यात येईल.अध्यक्ष यांना समान मतप्रसंगी एक जादा मत असेल पोटनियमात तरतूद असलेल्या विशिष्ट बाबीव्यतिरिक्त सर्व प्रश्नांचा निकाल बहुमताने होईल.

ड) वार्षिक सर्वसाधारण सभा व विशेष साधारण सभा ही कोरम अभावी तहकूब केली गेल्यास विषयपत्रिकेत नमूद असलेल्या विषयाचे विचारार्थ आणि निर्णयार्थ त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेच्या अर्ध्या तासानंतर सभेचे कामकाज सुरु करण्यात येईल.अशा त-हेने तहकूब झालेल्या सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही याबाबतचा अंतर्भाव वार्षिक साधारण सभा व विशेष साधारण सभेकरिता आलेल्या नोटीशीत करण्यात यावा.

इ) बँकेस संलग्न असलेल्या व्यक्ती सभासदांखेरीज अन्य सभासदांना व्यवस्थापक समिती ठरावान्वये बँकेच्या साधारण/ विशेष साधारण सभेत भाग घेण्यासाठी प्रतिनिधी नियुक्ती करता येईल.

फ) ३१ मार्च अगर त्यापुर्वी ज्यांना बँकेचे सभासद करुन घेता आले आहे, फक्त अशा सभासदांनाच वार्षिक साधारण सभेच्या आणि विशेष साधारण सभेच्या कामकाजात भाग घेता येईल.

ग) एकापेक्षा अधिक इसम संयुक्तरित्या बँकेचे एक किंवा त्याहून अधिक भाग धारण करीत असतील त्यावेळेस अशा रितीने धारण केलेल्या भागासंबंधी बँकेच्या भाग नोंदणीवहीत ज्या इसमाचे नांव पहिले असेल त्यासच फक्त खालील अधिकार असतील.

१) बँकेच्या सभासदाचे
२) बँकेचा भाग-दाखला/दाखले मिळण्याचा,
३) बँकेच्या सुचना मिळण्याचा
४) बॅकेच्या साधारण सभेस उपस्थित राहून सभेत भाग घेण्याचा ( क्रमांक ४ च्या अधिकाराबाबत पहिल्या सभासदाच्या अनुपस्थित ज्याचे नांव दुसरे असेल त्याला अधिकार राहील व त्या दोघांच्या अनुपस्थित ज्याचे नांव नंतर असेल त्याला अधिकार राहील.अशा इसमास बँकेने दिलेली कोणतीही सुचना संयुक्त रितीने बँकेचे भाग धारण करणा-या सर्व इसमांना दिली गेली असे समजण्यात येईल.)

ह) बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष व त्यांचे गैरहजेरीत बँकेचे उपाध्यक्ष साधारण व विशेष साधारण सभेचे कामकाज चालवतील. अध्यक्ष व उपाध्यक्ष दोघेही गैरहजर असल्यास,साधारण सभेस/विशेष साधारण सभेस हजर असलेले सभासद त्यांच्यामधील एकास अध्यक्ष निवडतील. समान मतप्रसंगी सभेच्या अध्यक्षांना एक जादा मत असेल.

**(२६)** वार्षिक व विशेष असे बँकेच्या साधारण सभेचे दोन प्रकार राहतील. (पहिल्या साधारण सभेस वार्षिक साधारण सभेचे अधिकार राहतील.)

**(२७)** बँकेची वार्षिक साधारण सभा दरसाल महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ मधील तरतूदीनुसार आर्थिक वर्ष संपल्यापासून सहा महिन्याच्या आत म्हणजे दि.३० सप्टेंबर पर्यंत घेणे बंधनकारक राहील. सदर सभेत खालील कामकाज करण्यात येईल :-

१) बँकेच्या संचालक मंडळाने तयार केलेला वार्षिक अहवाल, हिशेबी पत्रके विचारात घेणे, बँकेचा व्यवहार व कामकाजाचा आढावा घेणे,नफ्याची विभागणी व विनियोग मंजूर करणे. तसेच बँकेचे पुढील वर्षाचे अंदाजपत्रक ठेवणे.
२) बँकेच्या संचालक मंडळाने केलेल्या शिफारशीचे मर्यादेत बँकेच्या भागावरील लाभांश जाहीर करणे.
३) बँकेच्या व बँकेस संलग्न असलेल्या संस्थांच्या आर्थिक परिस्थितीवर परिणाम करणा-या अशा सर्व बाबींची दखल घेणे व त्यासंबंधात जरुर ते निर्णय घेणे.
४) वैधानिक हिशेब तपासणीस यांचा बँकेच्या मागील आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे, तसेच मागील / त्यापूर्वीच्या लेखापरिक्षणाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे. त्याचप्रमाणे चालू आर्थिक वर्षाच्या

लेखापरिक्षणासाठी सहकार कायद्यातील तरतूदीनुसार वैधानिक लेखापरिक्षकाची नियुक्ती करणे.

५) नोंदणी अधिकारी यांनी सभेकडे पाठविलेले विषय विचारात घेणे

६) बँकेच्या पोटनियमातील दुरुस्ती व बँकेचे सभासदत्व रद्द करण्यासंबंधीचे विषय सोडून अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेपुढे आयत्यावेळी येणारे कामकाज करणे.

७) बँकेच्या संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभेस आणि विशेष साधारण सभेस शिफारस केलेल्या पोटनियमांची दुरुस्ती किंवा नवीन पोटनियमांचा मसुदा संमत करणे अगर त्यात योग्य तो बदल करुन मंजूर करणे या अनुषंगाने निर्णय घेणे.

८) बँकेच्या सर्वसाधारण सभेस कोणत्याही संघीय संरचनेशी संलग्न किंवा असंलग्न होण्याचा निर्णय बँकेच्या एकूण सदस्यांपैकी तीन चतुर्थांश सदस्यांचा बहुमताने घेण्याचा अधिकार राहील.

साधारण सभेचे इतिवृत्त साधारण सभेच्या अध्यक्षांच्या सहीने साधारण सभेच्या इतिवृत्तवहीत नोंदविले जाईल.

**(२८)** अ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७६ (१) मध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार बँकेचे चेअरमन अगर संचालक मंडळाचे बहुसंख्य सदस्य विशेष साधारण सभा केव्हाही व कोणत्याही वेळी बोलावतील आणि जर

१) बँकेच्या एकुण सभासदांपैकी १/५ किंवा ५०० सभासदांनी तशी लेखी मागणी केल्यास, किंवा

२) निबंधक,सहकारी संस्था,यांनी तसे आदेश दिल्यास, किंवा

३) ही बँक ज्या फेडरल संस्थेला संलग्न आहे अशा फेडरल संस्थेच्या संचालक मंडळाने तशी मागणी केल्यास अशी मागणी किंवा आदेश आलेल्या तारखेपासून एक महिन्याचे आत अशी विशेष साधारण सभा बोलावली जाईल मात्र अशा तऱ्हेने बोलावलेल्या सभेत आयत्या वेळचे विषय घेतले जाणार नाहीत. बँकेस संलग्न असलेल्या संस्थांकडून विशेष साधारण सभेची मागणी केली गेली असल्यास अशा मागणीवर प्रत्येक संबंधीत संस्थेच्या व्यवस्थापक मंडळावरील निदान तीन सदस्यांच्या स्वाक्ष-या असल्या पाहिजेत. ज्या विशिष्ट विषयावर निर्णयाची मागणी आहे ते विषय स्पष्टपणे नमूद केलेले असले पाहिजेत.

ब) प्रतिनिधींच्या मागणीवरुन विशेष साधारण सभा पोटनियम २८ अ चे तरतूदीनुसार बोलाविली असेल व सभेच्या ठरलेल्या वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत काम चालविण्यास गणसंख्या नसेल तर पोटनियम क्रमांक २५ ड) प्रमाणे सभेचे कामकाज पार पाडणेत येइल.

**(२९)** बँकेच्या व्यक्ती सभासदांचा वार्षिक साधारण/विशेष साधारण सभेतील मतदानाचा हक्क महाराष्ट्र को-ऑपरेटिव्ह सोसायटीज रुल्स १९६१ मधील तरतूदीनुसार नियंत्रित राहील.

## ८. संचालक मंडळ

**(३०)** १) बँकेचा व्यवहार व कामकाज यांची व्यवस्था खाली नमूद केल्याप्रमाणे निवडून आलेल्या **२१** पेक्षा जास्त सदस्य नाहीत अशा संचालक मंडळाच्या हाती राहील.

**अ) नागरी सहकारी बँकांचे प्रतिनिधीत्व करणारे दोन संचालक. -- २**

**ब) पगारदार सेवकांच्या/नोकरांच्या सह.पतसंस्थांचे प्रतिनिधीत्व करणारा एक संचालक. -- १**

**क) नागरी सहकारी पतसंस्थांचे प्रतिनिधीत्व करणारा एक संचालक. --१**

**ड) मध्यवर्ती ग्राहक सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारा एक संचालक. -- १**

**ई) प्राथमिक ग्राहक सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारा एक संचालक. -- १**

**फ) सहकारी गृहनिर्माण संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारे दोन संचालक. -- २**

**ग) मजूर सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारे दोन संचालक -- २**

**ह) सहकारी औद्यो.संस्था आणि औद्योगिक इस्टेटी यांचे प्रतिनिधीत्व करणारे दोन संचालक. --२**

**इ) महिला सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारा एक संचालक. --१**

**ज) वरील (अ) ते (इ) द्वारे ज्यांचे अन्य रीतीने प्रतिनिधीत्व करण्यात आलेले नाही अशा इतर सहकारी संस्थांचे प्रतिनिधीत्व करणारे दोन संचालक. -- २**

**ख) व्यक्तीगत सभासदांचे प्रतिनिधीत्व करणारा एक संचालक. -- १**

**ब)** संचालक मंडळाच्या निवडणूकी बद्दलच्या बँकेच्या पोटनियमात इतर काहीही असले तरी संचालक मंडळावर खालीलप्रकारच्या सभासदांचेसाठी जागा राखीव राहतील. या जागा

| | | |
|---|---|---|
| १) | महिला प्रतिनिधी | २ |
| २) | अनुसुचित जाती किंवा अनुसुचित जमातीतील सदस्य | १ |
| ३) | इतर मागासवर्गातील सदस्य | १ |
| ४) | विमुक्त जाती, भटक्या जमाती किंवा विशेष मागासवर्गीय सदस्य | १ |

या व्यतिरिक्त २ तज्ञ संचालकांना समाविष्ट करता येईल. (संचालक मंडळाची सदस्य संख्या १७ पर्यंत निश्चित केली असल्यास त्या ठिकाणी १ कार्यलक्षी संचालक असेल व अशी संख्या १७ पेक्षा जास्त २१ पर्यंत निश्चित केली असल्यास त्या ठिकाणी २ कार्यलक्ष्री संचालक राहतील.)

**ड) तज्ञ संचालक :-**

तज्ञ संचालक म्हणजे बँकिंग, व्यवस्थापन, वित्त, लेखा किंवा संस्थेच्या उद्देश व कार्यपध्दती संबंधीच्या विषयातील तज्ञ असणा-या व्यक्ती होय.

अ) नियुक्ती - संचालक मंडळ त्यांना स्विकृत करेल.

ब) मतदानाचा अधिकार - संचालक मंडळाच्या निवडणूकीच्या अनुषंगाने मतदान करण्याचा अधिकार नाही. मात्र संस्थेच्या व्यवसायाच्या अनुषंगाने कामकाजात ठराव व निर्णय यामध्ये त्याचे मत ग्राहय धरले जाईल.

क) गणपूर्तीसाठी - उच्च न्यायालयाच्या निकालानुसार पदाधिका-यांची निवड सोडून इतर सभांमध्ये ग्राहय धरली जाईल.

ई: **कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक (Functional director) :-** एक किंवा दोन

बँकेने नियुक्त केलेले मुख्य कार्यकारी अधिकारी / कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक हे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७४ (३) नुसार संचालक मंडळाचे पदसिध्द सदस्य असतील. सदर मुख्य कार्यकारी अधिकारी / कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक हे कार्यलक्ष्री संचालक म्हणून काम पहातील. बँकेच्या एखाद्या वरिष्ठ पातळीवरील अधिका-याची / खाते प्रमुखाची बँकेचा दुसरा कार्यलक्ष्री संचालक म्हणून संचालक मंडळ नियुक्ती करेल.

अ. नियुक्ती - संचालक मंडळ करेल.

ब. मतदानाचा अधिकार :- मतदानाचा अधिकार नाही. परंतु संचालक मंडळ सभेमध्ये आलेल्या विषयाच्या अनुषंगाने तो आपले मत (Opinion) मांडू शकेल वा ठरावाच्या बद्दल आपले अभिप्राय नोंदवू शकेल.

क. अन्यथा उच्च न्यायालयाच्या निकालानुसार पदाधिका-यांची निवड सोडून इतर ठिकाणी गणपूर्तीसाठी ग्राहय धरली जाईल.

१. बँकेच्या संचालक मंडळाची मुदत ती पाच वर्षाची राहणार असून हा कालावधी निवडणूकीच्या दिवसापासून मोजण्यात येईल.

२. संचालक मंडळाच्या सभेस निवडून आलेल्या एकूण संचालकांच्या ५१% पेक्षा कमी नसेल इतका कोरम (गणसंख्या ) असेल.

३. संचालक मंडळ समिती व उपसमिती सभाच्या उपस्थितीसाठी तसेच तत्सम इतर कारणासाठी संचालक मंडळ सदस्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ यामधील तरतूदीनुसार आणि अगर नोंदणी अधिकारी यांनी दिलेल्या परवानगी नुसार प्रवास खर्च, दैनिक भत्ता, बैठक भत्ता इत्यादी आदा करता येईल. तसेच प्रवासाकरिता कोणत्याही मान्य उपलब्ध माध्यमाच्या सुविधेतील **उच्चतम** श्रेणी यासंदर्भात वापर करता येईल.

३१. मुख्य कार्यकारी अधिकारी /कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक हे संचालक मंडळाचे सचिव म्हणून काम पाहतील. मात्र त्यांच्या अनुपथितीत उपमुख्याधिकारी कार्यकारी अधिकारी किंवा संचालक मंडळाने प्राधीकृत केलेला अन्य कोणताही अधिकारी सचिव म्हणून काम पाहिल.

३२. संचालक मंडळामधील ज्या जागा मृत्यू, अपात्रता अगर अन्य कारणांमुळे मुदत संपण्यापूर्वी रिकम्या होतील त्या जागा सहकारी कायदा व त्याखाली केलेल्या नियमानुसार भरता येतील. रिक्त जागा भरली जाईतोपर्यंत संचालक मंडळाच्या सभा व निर्णय, जागा रिक्त आहेत व संचालक मंडळ संपूर्ण नाही याकारणास्तव अवैध मानले जाणार नाहीत.

३३. संचालक मंडळाच्या निवडणूकीनंतर बँकेच्या संचालक मंडळाची पहिली सभा निवडणूक निकालाच्या तारखेपासून पंधरा (१५) दिवसांच्या आत घेतली पाहिजे. अध्यक्ष व उपाध्यक्ष निवडीसाठी संचालक मंडळाच्या सभेचे कामकाज राज्य सहकारी निवडणूक प्राधिकारी किंवा

याबाबतीत त्यांनी नामनिर्दीष्ट केलेल्या अधिका-यांच्या अध्यक्षतेखाली व नियंत्रणाखाली चालेल. अशा रितीने निवडून आलेल्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचा कार्यकाल **५** वर्षाचा राहील.

३४. अध्यक्ष हजर असतील तेव्हा संचालक मंडळाच्या सभेचे कामकाज त्यांच्या नियंत्रणाखाली चालेल. अध्यक्षांच्या गैरहजेरीत संचालक मंडळाच्या सभेचे कामकाज उपाध्यक्ष पाहतील. अध्यक्ष उपाध्यक्ष दोघेही उपस्थित नसल्यास उपस्थित संचालक आपल्यापैकी एकाची त्या सभेचा अध्यक्ष म्हणून नियुक्त करतील. कोणत्याही प्रश्नाबाबत मतसमानता झाल्यास सभेच्या अध्यक्षास त्याच्या नेहमीच्या मताव्यतिरिक्त एक जादा निर्णयात्मक मत राहील. मृत्यू, राजीनामा, अपात्रता, बडतर्फी अगर अन्य कारणांमुळे अध्यक्ष / उपाध्यक्ष यांची पदे मुदत संपण्यापूर्वी रिक्त झाल्यास उरलेल्या मुदतीपूर्वी ती भरण्यासंबंधी सहकारी कायदयानुसार रितसर कार्यवाही केली जाईल.

३५. १. समितीची सभा चालू असताना संचालक या नात्याने असणा-या अधिकाराखेरीज अन्य कोणतेही अधिकार संचालकांना राहणार नाहीत.

२. बँकेचे संचालक मंडळावरील संचालकत्वाचे जागेच्या निवडणूकीस उभे राहण्यास खालील पात्रतेची आवश्यकता राहील.

**अ. निवडून येणा-या संचालकांचे जागेसाठी उमेदवारी करणारी व्यक्ती :-**

१. प्रतिनिधीत्व करीत असलेली संस्था पोटनियम क्रं.५ ब) मधील तरतूदीनुसार क्रियाशील सभासद असावी व प्रतिनिधीत्व करीत असलेली व्यक्ती अशा संस्थेची क्रियाशील सभासद असावी व ती व्यक्ती अशा संस्थेची किमान दोन वर्षे सभासद असली पाहिजे.

२. किमान एक वर्ष कोणत्याही सहकारी संस्थेच्या व्यवस्थापक समितीवर काम केलेले असली पाहिजे.

३. जो प्रतिनिधी संचालक मंडळाच्या निवडणूकीत भाग घेवू इच्छित आहे तो महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनुसार अपात्र असता कामा नये.

४. बँकेच्या सभासद संस्था ज्या बँकेच्या संचालक मंडळाच्या निवडणूकीमध्ये भाग घेवू इच्छित असतील व त्यासाठी आपला प्रतिनिधी पाठविणार असतील अशा संस्था महाराष्ट्र सहकार कायदा कलम २७(३) मधील तरतूदीनुसार पात्र असणे आवश्यक आहे.

५. प्रतिनिधीत्व करीता असलेली संस्था निवडणूकीलगत "अ" , "ब" अगर **"क"** ऑडिट वर्ग धारण करीत असलेली पाहिजे.

ब कोणीही व्यक्ती, व्यक्ती सभासदांचा प्रतिनिधी म्हणून खालील परिस्थितीत निवडून येण्यास अगर संचालक मंडळावर राहण्यास पात्र असणार नाही.

१. सदर व्यक्ती बँकेची पोटनियम क्र.५ ब) नुसार क्रियाशील सभासद नसेल तर

२. जर त्या कोणत्याही प्रचलित कायद्यानुसार एक वर्षे किंवा एक वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी तुंरुगवासाची शिक्षा झाली असेल तर

३ सहकार कायद्यातील अगर नियमातील तरतूदीनुसार तो संचालक म्हणून निवडून येण्यास अपात्र असेल तर तसेच सहकार कायदा कलम १४७ नुसार तो दोषी ठरला असेल तर

४. अ) व्यक्तिगत सभासद / संलग्न संस्था बँकेची थकबाकीदार असल्यास / झाल्यास

ब) तसेच संलग्न संस्थेवर थकबाकीदार, संलग्न संस्थेचा प्रतिनिधी संचालक असल्यास

५ खाली नमूद केलेल्या परिस्थितीत बँकेच्या संचालक मंडळावरील संचालकांचे संचालकत्व मुदत संपली नसली तरी संपुष्टात येईल.

अ. प्रतिनिधीत्व करीत असलेल्या संस्थेवरील त्याचे सभासदत्व रद्द झाल्यास.

ब. लेखी सूचना देवून संचालकत्वाचा राजीनामा दिल्यास.

क. संचालक मंडळाच्या लागोपाठ तीन सभांस पूर्व परवानगीशिवाय गैरहजर राहील्यास.

ड. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतूदीनुसार अपात्रता झाल्यास

इ. बँकेच्या कार्यक्षेत्रातील कोणत्याही नोंदणीकृत सहकारी संस्थेचा अथवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा पगारी अधिकारी अगर / आणि सेवक यास बँकेस संचालकत्व पदासाठी निवडणूकीस उभे रहाता येणार नाही.

५. तो बँकेचा थकबाकीदार असता कामा नये.

वर दर्शविलेल्या कारणामुळे (ब वगळता) संचालकांची जागा रिक्त झाल्याचे नोंदणी अधिका-यांकडून निर्णय झाल्यानंतरच संचालकांची जागा रिक्त झाली असेल समजण्यात येईल.

३. बँकेच्या संचालक मंडळाची अगर त्यावरील कोणत्याही सदस्याची निवडणूक सदोष होती अगर कोणताही संचालक निवडून येण्यास अपात्र होता असे भविष्यकाळात सिध्द झाले तरी सिध्द होण्यापूर्वी संचालक मंडळाने अगर त्यावरील कोणत्याही सदस्याने अधिकारपरत्वे घेतलेले सर्व निर्णय व केलेले सर्व कामकाज कायदेशीर व ग्राहय मानले जाईल.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक हे संचालक मंडळाची सभा किमान **दोन** महिन्यामध्ये एकदा घेण्याची व्यवस्था करतील. मात्र गरज पडेल त्याप्रमाणे संचालक मंडळाच्या सभा वेळोवेळी सदरचे अधिकारी बोलावतील.

५. संचालक मंडळाच्या प्रत्येक सभेची इतिवृत्ते सभा झाल्याच्या तारखेपासून सात दिवसाच्या आत संबंधीत सभेच्या अध्यक्षांच्या सहीने इतिवृत्त पुस्तकात नोंदवली जातील. इतिवृत्ताचा मसुदा पुढील सभेच्यापूर्वी प्रत्येक संचालकांकडे पाठविला जाईल. संचालक मंडळाच्या सभेची पूर्ण पाच दिवसांची पूर्वसूचना दिली जाईल.

६. संचालक मंडळ, समिती, उपसमिती यांची सभा कोरम अभावी तहकूब झाल्यास व कोरम असून कामकाज पूर्ण न करताच तहकूब केल्यास तहकूब सभेस हजर असणा-या सभासदांना सभेच्या नोटीसीची आवश्यकता नाही. मात्र जे सभासद हजर नसतील त्यांना नोटीसीने कळविणे आवश्यक आहे. सभा तहकूब करताना तहकूब सभेचा दिनांक व वेळ ठरवण्यात येईल.

७. विशेष परिस्थितीत संचालक मंडळाची सभा घेणे शक्य नसल्यास, अध्यक्ष सर्व संचालकाकडे संबंधीत कागदपत्रे फिरवून निर्णय घेतील व तो संचालक मंडळाच्या पुढील सभेपुढे कायम मान्यतेसाठी ठेवला जाईल. संबंधीत संचालकांमध्ये प्रकरणी मतभिन्नता झाल्यास, अशा प्रकरणावर संचालक मंडळाच्या सभेत निर्णय घेतला जाईल.

३६. सहकारी संस्था व इतर संस्था यांच्या व्यवस्थापक समितीवर वार्षिक / विशेष साधारण सभांना उपस्थित राहण्यासाठी बँक प्रतिनिधी म्हणून संचालक मंडळावरील सदस्यांचीच नियुक्ती केली जाईल.

३७ बँकेच्या पोटनियमातील तरतूदी, साधारण सभांनी दिलेले आदेश व महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा व त्याखालील नियम यास पात्र राहून बँकेच्या संचालक मंडळास बँकेचा कारभार व कामकाज चालविण्याचे सर्व अधिकार राहतील.

**३८. बँकेच्या संचालक मंडळाचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील :-**

१) सभासदत्वाकरिता दाखल झालेल्या अर्जाचा विचार करणे व भाग मंजूर करणे.

२) बँकेच्या पोटनियमास अनुसरुन पैसा उभारणे.

३) सर्वप्रकारच्या कर्जमागणी अर्जावर निर्णय घेणे.

४) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक अगर संचालक मंडळाने जरुर ते अधिकार दिलेला अधिकारी यांच्यामार्फत पैशाची देवघेव करणे.

५) बँकेच्या नोकरवर्गाबाबत खालील व्यवस्था करणे:-

अ) पगारी मुख्य कार्यकारी अधिकारी , व इतर सेवक वर्ग नेमून घेणे.

ब) त्यांचे मासिक वेतन ठरवणे.

क) त्यांना रजा देणे.

ड) त्यांच्या गैरहजेरीत,त्यांच्या कामाची व्यवस्था करणे.

इ) पगारी नोकरवर्गाची नेमणूक, राजीनामे, रजा, शिक्षा, नोकरीतून तात्पुरते दूर करणे, बडतर्फी आणि तत्सम बाबींची व्यवस्था मुंबई ओद्योगिक संबंध कायदा १९४६ खाली प्रमाणित केलेल्या स्थायी आदेशानुसार व बँकेच्या संचालक मंडळाने तयार केलेल्या आणि अगर नोंदणी अधिकारी,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य यांनी संमत केलेल्या नियमाप्रमाणेच चालेल.

फ) बँकेच्या सेवकमांड (स्टाफिंग पॅटर्न) कसा असावा याबाबत मार्गदर्शन / परवानगी घेणे.

ग) अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याचे दृष्टीने निरनिराळया हुद्याच्या अधिकाऱ्यांना निर्णयाचे अधिकार देणे.

६) सहकारी संस्था नियम व बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ यास पात्र राहून बँकेचा वार्षिक अहवाल,ताळेबंद व नफा-तोटा पत्रक तयार करणे.

७) कर्ज प्रकारानुसार थकबाकीचा आढावा घेणे,कर्ज परतफेड हप्त्यास मुदतवाढ देणे,हप्त्यांची पुर्नरचना करुन मिळण्याबाबतच्या अर्जाचा विचार करणे,तसेच नैसर्गिक आपत्तीचे वेळी अल्प मुदत पिक कर्जाचे मध्यम मुदत कर्जात रुपांतर करणे,रुपांतर मध्यम मुदत कर्जाचे पुनर्वसन करणे.

८) बँकेच्या कर्जदार संस्थांच्या तपासणीची व्यवस्था करणे.

९) बँकने स्विकारलेल्या सहकारी संस्थेच्या विसर्जन कार्याबाबत व्यवस्था करणे.

१०) बँकेतील सर्व सेवकांकरिता प्रॉव्हीडंट फंड ट्रस्टी यांच्या संमतीने प्रॉव्हीडंट फंड ॲक्टमधील तरतूदीनुसार कार्यवाही करवून घेणे.

११) बँकेची प्रशासकीय व्यवस्था, कामकाज, व्यवहार व बँकेस संलग्न असलेल्या सहकारी संस्थांवरील देखरेख यासंबंधी नियम घालून देणे व ते दुरुस्त करणे.

१२) बँकेच्या जंगम व स्थावर मिळकतीची देखभाल करणे,संचालक मंडळास बँकेचा व्यवहार व हीत यास जरुर वाटल्यास मिळकत संपादन करणे,मिळकत बांधणे,विकणे,गहाण टाकणे,दुरुस्त करणे,तिची पुर्नरचना करणे,तित सोयीस्कर बदल करणे, तिची अदलाबदल करणे,भाडयाने देणे,मुदतीच्या करारावर वापरास देणे,पोटकराराने देणे,आणि/अगर तत्सम व्यवस्था करणे.

१३) व्यापारी चलन असलेल्या आंतर्देशीय हुंडया काढणे,बेचन करणे,सहया करणे,खरेदी करणे, विकणे अगर चलन करणे. प्रतिवर्षी संचालक मंडळ प्रत्येक खातेदाराची मर्यादा ठरवील. बँकेचा अशा प्रकारचा व्यवहार संचालक मंडळाने त्यासंबंधी केलेल्या नियमानुसार चालेल. कोणत्याही परिस्थितीत ज्याचे वसुलीस मागणीचे बंधन नाही असे कोणतेही चलन कोणत्याही व्यक्तीतर्फे (ती सभासद असो वा नसो) बँकेस खरेदी करता अगर चलन करता येणार नाही.

१४) बँकेच्या मालकीचे भाग व कर्ज रोखे विकणे,वर्ग करणे,तारण ठेवणे व नवीन भाग व कर्ज रोखे खरेदी करण्याकरिता लागणारे जरुर ते कागदपत्र करुन देणे अगर बँकेच्या वतीने असे व्यवहार करण्याबाबत अधिकार संचालक मंडळाचे दोन किंवा अधिक सदस्य आणि मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक अगर संचालक मंडळ समितीने प्राधिकृत केलेला अधिकारी यांना देणे.

१५) बिगर सभासदांना ओव्हरड्राप्ट व कर्ज देण्यासंबंधी आणि महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा यामधील तरतूदीस पात्र राहून वेळोवेळी नियम करणे,त्यात फेरबदल करणे,बिगर सभासदांच्या ओव्हरड्राप्ट व कर्ज मागणी अर्जावर महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यास पात्र राहून निर्णय घेणे.

१६) कार्यकारी औद्योगिक समिती व भांडवल समिती व्यतिरिक्त **नाबार्डने वेळोवेळी सूचित केल्यानुसार** दरसाल ज्या कामासाठी आवश्यकता वाटेल त्याप्रमाणे जास्तीत जास्त आठ उपसमित्यांची नेमणूक करणे व अशा उपसमितीस संचालक मंडळाचे अधिकार देणे. प्रत्येक उपसमितीच्या सदस्याची संख्या १४ पेक्षा जास्त असणार नाही. प्रत्येक उपसमितीतील संचालक मंडळाचे अध्यक्ष यांचा समावेश बंधनकारक राहील व ते उपसमितीचे अध्यक्ष राहतील उपसमित्यांचे सदस्य हे निवडून आलेल्या संचालकांपैकीच असतील. उपसमितीच्या सभेस **५०% पेक्षा जास्त** हजर सभासदांची गणसंख्या राहील. कोणत्याही समिती / उपसमितीची सभा बोलविण्यास पाच पूर्ण दिवसांची पूर्वसुचना दिली पाहिजे.

१७) ज्या ज्या कारणाकरिता निरनिराळे निधी निर्माण केलेले असतील त्या त्या कारणाकरिता अशा निधीचा पोटनियमानुसार विनियोग करणे.

१८) निबंधक,सहकारी संस्था समिती यांच्या पूर्वसंमतीने बँकेच्या शाखा व नियमीत कक्ष उघडणे.

१९) बँकेचा कारभार चालविण्यास आवश्यक असे सर्व व्यवहार करणे.

२०) ज्या संस्थांची व्यवस्थापन मंडळे बरखास्त केली आहेत व ज्यांचा कारभार बँकेकडे सोपविण्यात आलेला आहे अशा संस्थांचा कारभार चालविण्याची व्यवस्था करणे.

२१) राज्य सहकारी बँक,आणि/अगर सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य यांनी घालून दिलेल्या नियमानुसार अधिका-यांचा एक संच ठेवणे व त्याचा उपयोग करुन घेणे.

२२) ठेवी व सर्व प्रकारच्या कर्जे यावरील व्याजाचे दर रिझर्व्ह बँक/नाबार्ड यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार वेळोवेळी निश्चित करणे.

२३) बँकेच्या सेवेत कर्मचा-यांची भरती करतांना,बढती देताना मागासवर्गीयांचे प्रमाण राखण्यासंबंधी शासनाकडून वेळोवळी दिले जाणारे आदेश विचारात घेणे,त्याचप्रमाणे कर्मचारी भरती/बढतीच्या वेळी मागासवर्गीयांचा अनुशेष भरुन काढण्याबाबतचे शासकीय आदेश विचारात घेणे.

२४) मा. संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सभासद प्राथमिक शेती संस्था, आदिवासी विविध कार्यकारी सहकारी संस्था सचिवांना बक्षीस / सानुग्रह अनुदान इ. सहाय्य बँकेने केलेल्या आर्थिक तरतूदीतून निबंधक यांचे पूर्वपरवानगीने अदा करणे.

२५) बँकेच्या सभासद, संचालक, अधिकारी कर्मचा-यांचे प्रशिक्षणासाठी, सभासदांचा बँकेच्या व्यवस्थापनातील सहभाग वाढविण्यासाठी व बँकेच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी आवश्यक उपाययोजना करणे. तसेच बँकेचे सभासद, संचालक, अधिकारी कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाचा वार्षिक आराखडा तयार करणे.

**(३९)** या पोटनियमामध्ये काहीही तरतूदी असल्या तरी बँकेच्या व बँकेस संलग्न असलेल्या संस्थांच्या सभासदांचे जीवनमान,व्यवसाय उत्पादनाच्या पध्दती यामध्ये सुधारणा

करण्याकरिता नाबार्ड व रिझर्व्ह बँक यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार संचालक मंडळास नियम तयार करुन कोणताही व्यवसाय हाती घेता येईल आणि / अगर अशा व्यवसायाकरिता / कारणाकरिता कर्जपुरवठा करता येईल.

**(४०)** बँकेच्या पैशाचा,कर्जरोख्यांचा अगर दप्तराच्या व्यवहाराशी बँकेतील ज्या पगारी सेवकांचा प्रत्यक्ष संबंध येत असेल अशा प्रत्येक पगारी सेवकाने,कामांची जबाबदारी स्विकारण्यापूर्वी बँकेच्या वतीने त्यांनी केलेल्या बँकेच्या पैशाच्या व्यवहाराचा संपूर्ण व सत्य हिशेब देता यावा यासाठी बँकेच्या संचालक मंडळाच्या आदेशाप्रमाणे जरुन तो जामीन/करारनामा करुन दिला पाहिजे.

**(४१)** सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य यांनी मान्य केलेल्या पोटनियमासोबत जोडलेल्या परिशिष्टात समाविष्ट केलेले आणि अगर संचालक मंडळास आवश्यक वाटतील असे आपले कोणतेही अधिकार बँकेच्या संचालक मंडळास समिती,उपसमिती,अध्यक्ष अगर मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक आणि इतर अधिकारी यांना देता येतील.

## मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक :-

बँकेच्या संचालक मंडळाने आपले अधिकार समिती, अध्यक्ष, सरव्यवस्थापक अगर व्यवस्थापक अगर उपव्यवस्थापक/अधिकारी प्रथम श्रेणी / अधिकारी द्वितीय श्रेणी / एजंट या हुद्यापेक्षा कमी हुद्दा नसलेला अधिकारी यांच्याकडे सुपूर्त करण्याचे परिशिष्ट,

**पोटनियम क्रमांक ४१ खाली**

| अ.क्र | अधिकार | कोणास सुपूर्त करता येईल |
|---|---|---|
| १ अ) | बँकेच्या संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या विशिष्ट बाबी सोडून कर्ज, क्रेडिट अगर अल्पमुदत,मध्यम मुदत, दिर्घ मुदत कर्ज मागणी अर्जाचा विचार करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| (ब) | ठेवी / कर्ज रोखे/शासन पुरस्कृत आर्थिक हमी प्रमाणपत्रे,सोने चांदीचे दागिन्यांचे तारणावर संचालक मंडळ ठरवून देईल त्या मर्यादेपर्यंत ओव्हरड्राफ्ट / कर्ज मंजुर करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| (क) | अल्पमुदत पीक कर्ज मंजुर करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| २ अ) | सेवक वर्ग नेमणे, त्यावर नियंत्रण ठेवणे. संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या प्रमाणात सेवक वर्गाचे पगार ठरविणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| (ब) | संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार सेवक वर्गास किरकोळ रजा देणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| (क) | संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार सेवक वर्गास हक्काची / वैद्यकिय रजा देणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| (ड) | संचालक मंडळाच्या धोरणानुसार सेवक वर्गाच्या बदल्या करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ३ | कर्जफेडीच्या हप्त्यास मुदतवाढ मिळण्याबाबतच्या अर्जाचा विचार करणे, हप्त्याची पुर्नरचना करणे,कर्जाचे रुपांतर व पुर्नवसन करणेबाबतच्या अर्जाचा विचार करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ४ | अंदाजपत्रकाच्या तरतूदीस पात्र राहून बँकेच्या जंगम मिळकतीच्या देखभालीसाठी एका वेळेस रु.२००००/- पर्यंतच्या खर्चाची बिले मंजूर करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ५ | अंदाजपत्रकाच्या तरतुदीस पात्र राहून अन्य कारणाकरीता एका वेळच्या खर्चाची कमाल मर्यादा रु.५०००/- पर्यंत राहील. | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ६ | बँकेच्या शाखाधिकाऱ्यांमार्फत शाखांचे कामकाज व व्यवहाराची व्यवस्था ठेवणे, त्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे. त्या अनुषंगाने मा.संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार खर्चास मंजुरी देणे, मा.संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या मर्यादेपर्यंत कर्ज प्रकरणाची छाननी करुन अभिप्राय देणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ७ | सरकारी कर्जरोख्यात बँकेचे भांडवल गुंतविणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ८ | एका वेळेस रु. २००००/- पेक्षा जास्त रकमेच्या खर्चाची बीले मंजुर करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ९ | बँकेच्या शाखांकडे बँकेच्या वतीने हुंडया व अन्य चलन, दस्तऐवज काढणे,स्विकारणे, सहया करणे,चलन करणे व विकणे, यासंबंधीचे अधिकार बँकेतील विशिष्ट सेवकास देणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| १० | सर्व प्रकारच्या ठेवीवरील व्याजाचे दर नियंत्रीत करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| ११ | इतर पोटनियमात काहीही तरतूद असली तरी ज्या वेळी संचालक मंडळ/ निरनिराळया समिती सभांना अवधी असेल किंवा समिती सभा काही तांत्रिक कारणामुळे होऊ शकणार नाही किंवा तातडीची निकड/गरजअसून अशा वेळी कर्ज मागणी प्रकरणी निर्णय घेण्याचा,बँकेच्या वतीने बँक गॅरंटी देण्याचा व निकड विचारात घेऊन खर्चाची बीले मंजुर करण्याबाबत निर्णय घेण्याचा अधिकार बँकेचे अध्यक्ष यांना राहील. मात्र अशी मंजुर प्रकरणे व बीले कायम मान्यतेसाठी संचालक मंडळ / समिती सभेपुढे मंजुरीसाठी ठेवली पाहिजे. | मुख्य कार्यकारी अधिकारी/ सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| १२ | पोस्टेज-फ्रॅकिंग,टेलिफोन भाडे, बिले, विजेची बीले मंजुर करणे, शिक्षण कर,वाहन कर, म्युनिसीपल कर, ग्रामपंचायत, महानगरपालिका इ. सर्व प्रकारच्या कराची बीले मंजुर करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| १३ | मा.संचालक मंडळ, मा.कार्यकारी समिती, मा.सेवकवर्ग उपसमिती, मा.औद्योगिक कर्ज व ग्रामिण कारागीर योजना उपसमिती व वेळोवेळी नियुक्त केलेल्या उपसमित्यांनी संमत केलेल्या ठरावांची कार्यवाही करणे, मंजुर बीलांच्या रकमा संबंधीतांना अदा करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| १४ | बँकेच्या विरुध्द दाखल झालेल्या केसच्या कामी बँकेच्या वतीने दाखल केलेल्या कोणत्याही केसच्या कामी (की ज्यामध्ये सामील, विसर्जीत संस्थांचे अस्तित्व संपुष्टात येण्यापुर्वी बँकेने वसुलीसाठी दाव्यायोग्य हक्क(ॲक्शनेबल क्लेम्स) बेचन करुन घेतलेले आहेत त्याचाही अंतर्भाव होतो) वकिलपत्र दाखल करणे,जबाब देणे,उपस्थित राहणे,केस संबंधीच्या कागदपत्रांवर सहया करणे इ. | मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| १५(अ) | प्रासंगिक कारणास्तव निरनिराळया कारणांसाठी रु. ५०००/- पेक्षा जास्त रक्कम अनामत खात्यातून देणे | मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| (ब) | प्रासंगिक कारणास्तव निरनिराळया कारणांसाठी रु.५०००/- पर्यंत रक्कम अनामत खात्यातून देणे | मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| १६ | अंदाजपत्रकाच्या तरतूदीस पात्र राहून संचालक मंडळाने ठरवून दिलेल्या धोरणानुसार सेवक वर्गाची प्रवास भत्ता बिले,फिरती डायऱ्या मंजुर करणे, मुख्य कचेरी व शाखांकडील सादील खर्च,किरकोळ खर्च,विज खर्च,टेलिफोन खर्च,पोस्टेज,फ्रॅकिंग मशिन चार्जेस,दुरुस्ती खर्च,सर्व्हिस चार्जेस,विमा हप्ता इ. खर्चाची बीले मंजुर करणे | मुख्य कार्यकारी अधिकारी / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |
| १७ | मा.संचालक मंडळाने संमत केलेल्या अटी व शर्तीस पात्र राहून विविध प्रकारची कर्जे मंजुर करणे | मुख्य कार्यकारी अधिकार / सरव्यवस्थापक / बँकेच्या सोयीप्रमाणे अन्य अधिकारी |

## ९.कार्यकारी समिती

**(४२)** अ) बँकेचे संचालक मंडळ,प्रत्येक चार महिन्याकरिता कार्यकारी समितीच्या सदस्यांची निवड करील. या कार्यकारी समितीमध्ये बँकेचे अध्यक्ष यांचा समावेश बंधनकारक राहील व ते कार्यकारी समितीचे अध्यक्ष राहतील. या समितीच्या सदस्यांची कमाल संख्या १४ राहील. चार महिन्याच्या मुदतीनंतर निवृत्त झालेल्या सदस्यांच्या जागी बँकेच्या संचालक मंडळावरील अन्य सदस्यांची आळीपाळीने नेमणूक केली जाईल. **कार्यकारी समितीची सभा २ महिन्यातून किमान १ वेळा तरी बोलाविली पाहिजे. (मात्र गरज पडेल त्याप्रमाणे कार्यकारी समितीच्या सभा वेळोवेळी सदरचे अधिकारी बोलावू शकतील.) सदर समितीस निवडूण आलेल्या संचालकांपैकी ५०% पेक्षा जास्त गणसंख्या राहील.**

ब) कार्यकारी समितीस खालील अधिकार व कर्तव्ये राहतील. याशिवाय संचालक मंडळास अन्य बाबींसंबंधी कार्यकारी समितीस अधिकार देता येतील.

१) सभासद करुन घेणे,

२) सभासदांना भाग मंजूर करणे,

३) भाग वर्गावर्गीस मंजुरी देणे,

४) कर्जमागणी अर्जाचा/तदनुषंगिक इतर आर्थिक मागण्यांचा विचार करून मंजूरी देणे.

५) बँकेचा वार्षिक अहवाल तयार करणे,

६) थकबाकी प्रकरणांची छानननी करुन त्याबाबत योग्य ती वसुलीची तजवीज करणे,

७) निरनिराळया श्रेणीतील सेवक नेमणे,व त्यावर नियंत्रण ठेवणे,गैरवर्तन,शिस्तपालन इत्यादी संदर्भात सेवकांविरुध्द कारवाई करणे,सेवेतून बडतर्फ करणे,कमी करणे,सेवेतून निलंबीत करणे,

८) सेवकामधून घ्यावयाच्या जामिनकीचा प्रकार व रक्कम जरूर वाटल्यास निश्चित करणे,सर्वसाधारणपणे संचालक मंडळाने दिलेले आदेश व सूचनांची कार्यवाही करणे,

९) बँकेच्या विरुध्द दाखल झालेल्या केसच्या कामी/बँकेच्या वतीने दाखल केलेल्या केसचे कामी वकीलपत्र दाखल करणे,जबाब देणे,उपस्थित राहणे इत्यादी अधिकार देणे.

**१०) एकाच वेळी रू.५.०० लाखापर्यंत खर्च करणे आणि त्याची देयके मंजूर करणे.**

## १०. औद्योगिक कर्ज व ग्रामीण कारागीर योजना समिती

**(४३)** (अ) बँकेचे संचालक मंडळ प्रत्येक चार महिन्याकरिता ओद्योगिक कर्ज व ग्रामिण कारागीर योजना समितीच्या सदस्यांची निवड करील. या समितीमध्ये बँकचे अध्यक्ष यांचा समावेश बंधनकारक राहील व ते या समितीचे अध्यक्ष राहतील. या समितीच्या सदस्यांची कमाल संख्या १४ राहील. या सदस्यांशिवाय (१) मा.जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था, अगर त्यांचा प्रतिनिधी (२) मा.जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, (३) ग्रामोद्योग संस्थांचा एक प्रतिनिधी यांचा निमंत्रित म्हणून समावेश असेल. मात्र त्यांना मतदानाचा अधिकार असणार नाही. सदर समितीस **५०% पेक्षा जास्त** उपस्थित सभासदांची गणसंख्या राहील. निमंत्रितांचा विचार गणसंख्येच्या पूर्ततेसाठी केला जाणार नाही.

(ब) औद्योगिक कर्ज व ग्रामीण कारागीर योजना समितीची अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील:-

१) औद्योगिक संस्था, ग्राहक संस्था, गृहनिर्माण संस्था, औद्योगिक उत्पादन संस्था, कामगारांच्या संस्था, विणकर संस्था, काटकसर व नागरी संस्था इत्यादी बिगर शेती संस्था आणि सर्वसाधारण संस्था व कारागिरांच्या संस्था यांच्या कर्ज मागणी अर्जाचा विचार करणे.

२) थकबाकी प्रकरणांची छाननी करुन त्याबाबत वसुलीची तजवीज करणे.

३) कर्ज परतफेडीच्या हप्त्यास मुदतवाढ मिळण्याबाबतच्या अर्जाचा विचार करणे.

४) सर्वसाधारणपणे संचालक मंडळाने दिलेले आदेश व सुचनांची कार्यवाही करणे.

## ११. ऑडिट समिती

**(४३)** अ) बँकेचे संचालक मंडळ प्रत्येक वर्षाकरिता ऑडिट समितीच्या सदस्यांची निवड करील ऑडिट समितीमध्ये बँकेचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश राहणार नाही. बँकेचे उपाध्यक्ष हे ऑडिट समितीचे अध्यक्ष राहतील.या समितीच्या सदस्यांची कमाल संख्या **३** राहील. बँकेच्या संचालक मंडळावरील संचालकामध्ये सनदी लेखापाल (चार्टर्ड अकौंटट) असल्यास अशा सनदी लेखापालाचा (चार्टर्ड अकौंटट) समावेश ऑडिट समितीमध्ये बंधनकारक राहील. बँकेचे संचालक मंडळावरील संचालकांमध्ये सनदी लेखापालाचा (चार्टर्ड अकौंटट) समावेश नसल्यास बँकेचे संचालक मंडळ ऑडिट समितीवर सनदी लेखापाल (चार्टर्ड अकौंटट) यांची नियुक्ती करील. सनदी लेखापालास (चार्टर्ड अकौंटट) ऑडिट समितीमध्ये मतदान करण्याचा अधिकार राहील. ऑडिट समितीची सभा ३ महिन्यातून एकदा बोलाविली पाहीजे. सदर समितीस तीन उपस्थित सभासदांची गणसंख्या राहील मात्र गणसंख्येकरिता सनदी लेखापाल(चार्टर्ड अकौंटट) असणे आवश्यक राहील. ऑडिट समितीची पोटनियमास पात्र राहून समितीच्या अध्यक्षाच्या अनुमतीने पूर्वसूचना देणे.

सभेस उपस्थित राहून इतिवृत्त नोंदविणे इ.कामांसाठी मुख्य कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त संचालक मंडळाने प्राधीकृत केलेला अन्य अधिकारी समितीचे सचिव म्हणून काम पाहील.

ब ) ऑडिट समितीचे अधिकार कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील.

१) बँकेचे अंतर्गत तपासणी विभागाकडील कामकाजाचा आढावा घेवून आवश्यक त्या सूचना देणे.

२) अंतर्गत तपासणी/लेखापरिक्षण अधिक कार्यक्षम करण्याच्या दृष्टीने घेण्यात येत असलेल्या विविध प्रकारच्या तपासण्या/लेखापरिक्षण(अंतर्गत तपासणी / लेखापरिक्षण, सतत व समवर्ती लेखापरिक्षण इ.) यांचा कालावधी,कार्यक्षेत्र व दर्जा इ.बाबतीत आवश्यक त्या सुधारणा करणे.

३) विशेषतः असमाधानकारक कामकाज असलेल्या तसेच मोठा व्यवहार असलेल्या शाखांबाबत अंतर्गत तपासणी/लेखापरिक्षण अहवालांची माहिती/आढावा घेणे.

४) नाबार्ड/राज्य बँक/शासनाकडून बँकेच्या घेण्यात आलेल्या तपासणीच्या तसेच वैधानिक लेखापरिक्षण अहवालातील निरिक्षणांच्या केलेल्या पूर्ततेची/दोषपूर्तता अहवालांची माहिती घेवून ते संचालक मंडळापुढे सादर करणे.

५) पूर्तता अहवाल विलंबाने सादर करणे, पूर्तता न करणे, अपुरी पूर्तता करणे, असमाधानकारक पूर्तता असणे इ.बाबींबाबत जबाबदारी निश्चित करुन सदरच्या बाबींबाबत मा.संचालक मंडळ/कार्यकारी समितीस शिफारस करणे.

६) रिझर्व्ह बँक/नाबार्डकडील धोरणात्मक / मार्गदर्शनात्मक सूचनांद्वारे कळविलेले/ वेळोवेळी कळविण्यात येणारे अधिकार व कर्तव्ये राहतील.
संचालक मंडळ वेळोवेळी सोपवेल त्या प्रकरणी निर्णय घेणे.

## १२. मुख्य कार्यकारी अधिकारी/ कार्यकारी संचालक / सरव्यवस्थापक

**(४४)** बँकेच्या संचालक मंडळाकडून रिझर्व्ह बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक सुचनांनुसार (Fit and proper criteria) मुख्य कार्यकारी अधिकारी, कार्यकारी संचालक/ सरव्यवस्थापक यांची नेमणूक केली जाईल. मुख्य कार्यकारी अधिकारी , कार्यकारी संचालक/ सरव्यवस्थापक हे संचालक मंडळाचे सचिव म्हणून काम पाहतील, मात्र मुख्य कार्यकारी अधिकारी/ कार्यकारी संचालक/ सरव्यवस्थापक / व्यवस्थापक यांच्या अनुपस्थितीत संचालक मंडळाने प्राधिकृत केलेला अधिकारी सचिव म्हणून काम पाहील.

**(४५) बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी / कार्यकारी संचालक/ सरव्यवस्थापक यांचे अधिकार व कर्तव्ये खालीलप्रमाणे राहतील :-**

१) संचालक मंडळाने ताब्यात दिलेले अगर/आणि आलेले बँकेचे दप्तर,अधिकृत मुद्रा,स्थावर व जंगम मालमत्ता यांच्या सुरक्षिततेची जोखीम पत्करणे.

२) बँकेची साधारण सभा,संचालक मंडळाची सभा, बँकेची साधारण सभा, संचालक मंडळ सभा,कार्यकारी समिती, औद्योगिक समिती व इतर उपसमित्यांच्या सभा घेणेबाबत पोटनियमास पात्र राहून पुर्वसूचना देणे. मात्र सदर सभांची विषयपत्रिका अध्यक्षांच्या संमतीने ठरविली पाहिजे.

३) बँकेच्या वार्षिक साधारण सभा,विशेष साधारण सभा,कार्यकारी समिती,औद्योगिक समिती व इतर उपसमित्यांच्या सर्व सभांना उपस्थित राहून अशा सभांची इतिवृत्ते नोंदविणे.

४) बँकेच्या संचालक मंडळाच्या वतीने सर्व कार्यालयीन पत्रव्यवहार करणे.

५) बँकेतील पैशांच्या व मालमत्तेच्या सर्व व्यवहारांचा रीतसर हिशेब ठेवणे.

६) संचालक मंडळाच्या वतीने पैशाची देव-घेव करणे.

७) संचालक मंडळाने घालून दिलेल्या नियमानुसार बँकेस संलग्न असलेल्या संस्थांची तपासणी करणे. त्यांच्यावरील देखरेखीची व तपासणीची तरतूद करणे व त्यांना आवश्यक ते मार्गदर्शन करणे.

८) हाताखालील नोकरवर्गाचे कामकाजावर देखरेख ठेवणे व दुर्लक्षित बाबी संचालक मंडळाचे निदर्शनास आणून शिस्तीचे इलाजाबाबत आदेश घेणे.

९) संचालक मंडळाने घेतलेल्या नियमानुसार व आदेशानुसार बँकेच्या सरकारी व (गिल्टेज सिक्युरिटी) इतर कर्जरोखे,रोखे खरेदी करणे,वर्ग करणे,बेचन करणे,व्याज वसूल करणे, ताबेगहाण ठेवणे. **बँकेच्या जादा निधीची कायदेशीर गुंतवणूक रिझर्व्ह बँक, नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार महाराष्ट्र राज्य सहकारी बँक मर्यादित, व्यापारी बँकांच्या ठेवीमध्ये गुंतवणूक करणे व सर्टिफिकेट ऑफ डिपॉझिट मध्ये गुंतवणूक करणे, सार्वजनिक उपक्रमाचे कर्जरोखे, अखिल भारतीय आर्थिक संस्थांचे कर्जरोखे व कमर्शियल पेपर्समध्ये, सरकारी वचनचिठ्ठया, कर्जरोखे, म्युनिसिपल, जिल्हापरिषद व पोर्ट ट्रस्ट बॉंडस्, डिबेंचर्स इ.मध्ये गुंतवणूक करणे तसेच बँकेचे सभासद अगर ठेवीदाराकरिता कोणत्याही प्रकारची आर्थिक जबाबदारी न घेता वरील बाबींची खरेदी-विक्री, हस्तांतर, बेचन अगर तारण ठेवणे इ. व्यवहार करणे.**

१०) बँकेच्या पोटनियमानुसार व संबंधीत नियम व आदेशानुसार हुंडी व इतर निगोशिएबल इन्स्ट्रुमेंटस् बँकेच्या वतीने काढणे,स्विकारणे,बेचन करणे,चलन करणे,व विकणे.

११) ठरवून दिलेली हिशेब व नोंद पुस्तके ठेवणे.

१२) बँकेचे संचालक मंडळ नेमून देईल अगर सोपवतील ते कामे करणे.

१३) कर्जमागणी अर्जाची छाननी करुन ते निर्णयासाठी बँकेच्या संचालक मंडळ अगर कार्यकारी अगर
औद्योगिक समितीपुढे आपले अभिप्रायासह विचारासाठी व निर्णयासाठी ठेवणे.

१४) पोटनियमानुसार नेमलेल्या उपसमितीच्या कार्यक्षेत्रात येणारे अर्जाची छाननी करुन आपल्या अभिप्रायासह त्या त्या समितीपुढे विचारासाठी व निर्णयासाठी ठेवणे.

१५) मा. संचालक मंडळ, मा. कार्यकारी समिती, मा.ओद्योगिक समिती व इतर उपसमित्यांनी संमत केलेल्या ठरावांची कार्यवाही करणे.

१६) न्यायालयीन आदेशाची / बंधनकारक सुचना व आदेशाची अंमलबजावणी करणे व त्याची माहिती मा. संचालक मंडळ / व कार्यकारी समितीस देणे.

१७) सहकार कायद्यातील तरतूदीनुसार विहीत विवरणपत्रे निबंधकाकडे मुदतीत सादर करणे.

**१८) मुख्य कार्यकारी अधिकारी , कार्यकारी संचालक/ सरव्यवस्थापक त्यांच्या हाताखालील काम करणा-या कर्मचा-यांवर देखरेख ठेवतील आणि जर कोणाही कर्मचा-याकडून गैरवर्तणूक झाली तर त्याला/तीला दोषारोपपत्र देण्याचे बाकी निलंबन आदेश देण्यात येईल आणि चौकशी सुरु करुन निष्कर्ष अहवाल संचालक मंडळापुढे ठेवण्यात येईल.**

**१९) संचालक मंडळ / कार्यकारी समितीद्वारे देण्यात येणा-या मंजूरीस अधिन राहून तातडीच्या प्रयोजनाकरीता रु.२५.०० लाखापर्यंत कर्ज / अग्रीम रक्कम मंजूर करणे.**

## १३. संलग्न संस्थांची तपासणी

**(४६)** अ) बँकेचे कर्जदार असलेल्या संस्थांची किमान वर्षातून एक वेळ तपासणी होईल अशी व्यवस्था बँकेकडून केली जाईल.मात्र याशिवाय बँकेचे संचालक मंडळाने केलेल्या नियमानुसार बँकेच्या कोणत्याही अधिका-याकडून अगर/आणि संचालक मंडळाने विशेष अधिकार दिलेल्या बँकेच्या अधिका-याकडून संलग्न कर्जदार संस्थेची तपासणी केली जाईल संबंधीत संलग्न संस्था अगर/आणि सदर संस्थेचे अधिकारी तपासणीसाठी सर्वप्रकारचे सहाय्य तपासणी अधिकारी यास करतील.

ब) बँकेस संलग्न असलेल्या कोणत्याही कर्जदार संस्थेचे कामकाज असमाधानकारक असून सुधारणेसाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे असे बँकेचे संचालक मंडळास वाटल्यास संस्थेच्या कारभारातील दोष घालविण्याची उपाययोजना आखण्यासाठी अशा संस्थेस तिची साधारण सभा बोलाविण्याचा आदेश बँकेच्या संचालक मंडळास देता येईल.

**(४७)** बँकेस संलग्न असलेल्या प्रत्येक कर्जदार संस्थेवर खालील कर्तव्ये बजावण्याचे बंधन राहील.

१) बँकेने ठरवलेल्या नियमानुसार कामकाज करणे.

२) बँकेने नेमून दिलेली व मागितलेली पत्रके,तक्ते व माहिती बँकेकडे वेळचेवेळी पाठविणे.

३) कोणत्याही कर्ज देणा-या संस्थेकडून अगर राज्य सरकारकडून कर्ज घेण्यापुर्वी बँकेची मंजूरी घेणे.

४) बँकेच्या वार्षिक/विशेष साधारण सभांना तसेच मा. संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी संस्थेचा प्रतिनिधी पाठविणे.

५) बँकेच्या कोणत्याही अधिका-यास अगर हिशोब तपासणीस यांनी पुर्वसुचना दिली नसली तरीही संस्थेचे रोख शिल्लक व मालाचे साठे दाखविणे व हिशोबाच्या सर्व नोंदवहया तपासणीसाठी उपलब्ध करणे.

६) बँकेने निरनिराळया कर्जाच्या पतमर्यादा मंजूरीचे वेळी घातलेल्या अटी व नियम यांची पुर्तता व पालन कर्जदार संस्थेने केले पाहिजे अन्यथा अशा संस्थेचा निरनिराळया कर्जखात्यावरील व्यवहार पुर्वसुचनेशिवाय स्थगित करण्याची बँकेस मोकळीक राहील.

## १४. हिशोबपत्रके / तक्ते व दप्तर (दस्तऐवज/कागदपत्रे)

**(४८)** बँक खालील हिशोब व नोंदवहया ठेवील.

(अ) १) सभासद नोंद वही (यात महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यामध्ये कलम ३८ नुसार सभासदांची नोंद राहील.)
२) भाग नोंद वही (शेअर्सचे नोंदणीपुस्तक).
३) भाग वर्गावर्गी नोंद वही.
४) भागधारकाचे आपल्या पश्चात भाग/रक्कम मिळणा-या वारसाची नोंद.

(ब) रिझर्व्ह बँक/ नाबार्ड यांनी वेळोवेळी सूचित केल्याप्रमाणे नोंदवहया असतील तसेच बँकेच्या सोयीप्रमाणे या व्यतिरिक्त कामकाजाच्या सोयीने आवश्यक अशा नोंदवहया ठेवणे.

(क) १) संचालक मंडळ, कार्यकारी समिती,ऑडीट समिती औद्योगिक समिती व वेळोवेळी नेमलेल्या उपसमित्या यांच्या सभांची इतिवृत्ते.
२) साधारण/विशेष साधारण सभेचे इतिवृत्त.
३) कर्जदार संस्थांच्या वार्षिक तपासणीची नोंद वही.
४) बँकेच्या सर्व जंगम व स्थावर मिळकतीची नोंद वही.
५) डेडस्टॉक नोंदवही.
६) बँकेने दाखल केलेल्या लवाद दाव्याची आणि/अगर बँकेविरुध्द दाखल केलेल्या लवाद दाव्याची यांच्या बजावणीची अगर/आणि दिवाणी अगर फौजदारी कोर्टात दाखल केलेल्या दाव्याची बजावणीची नोंद वही.

(ड) १) सहकारी कायदा व त्याखालील नियम, बँकेचे पोटनियम व त्यानुसार केलेले सर्व प्रकारचे नियम.
२) बँकेचे वार्षिक अहवाल, ताळेबंद आणि वैधानिक तपासणी अहवाल व नाबार्ड / रिझर्व्ह बँक यांचे दोष दुरुस्ती अहवाल.
३) बँकेचे संचालक मंडळाने अगर/आणि नोंदणी अधिकारी यांनी वेळोवळी ठरवून दिलेल्या अन्य हिशोबांच्या वहया व नोंद वहया.

## १५ बँकेच्या सभासदास निरीक्षणासाठी उपलब्ध असावयाचे दप्तर

**(४९)** अ) प्रत्येक सभासदास त्याने संस्थेबरोबर केलेल्या व्यवहाराबाबतची माहिती त्याच्या मागणीप्रमाणे त्यास उपलब्ध करुन देणे बॅकेस बंधनकारक आहे.

ब) बँकेच्या सभासदास सहकारी कायदा व त्याखाली केलेले नियम यास पात्र राहून बँकेचे दप्तर निरीक्षणास मिळण्याचा हक्क राहील.

५० बँकेच्या सभासदास बँकेच्या सोयीने व बँकेने ठरविलेले शुल्क देवून, त्याने बँकेस पाठविलेल्या कागदपत्रांच्या नकला आणि कायद्यानुसार मिळावयाच्या कागदपत्रांच्या नकला मिळण्याचा हक्क राहील. मात्र अर्जाच्या तारखेपासून जास्तीत जास्त एक महिन्यात मागितलेल्या नकला पुरविल्या गेल्या पाहिजेत.

५१. महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा कलम ४० याच्या संदर्भात संबंधीत कागदपत्र अगर बँकेच्या दप्तरी असलेल्या नोंदीच्या अस्सल नकला बँकेच्या शिक्क्यांसह बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अथवा संचालक मंडळाने प्राधिकृत केलेला अधिकारी यांच्या सहीने देता येतील.

## १६. कर्जे

**(५२)** अ) बँकेस व्यक्तींना व संलग्न असलेल्या सर्वप्रकारच्या संस्थांना तसेच त्यांना त्यांच्या सभासदांना कर्ज पुरविण्याकरिता बँक कर्ज देईल मात्र संलग्न संस्थेने बँकेस ठरवून दिलेल्या नमुन्यातच अर्ज करणे जरुर आहे.

ब) कर्ज या संज्ञेत खालीलप्रकारच्या कर्जांचा समावेश होईल

१) अल्प मुदत कर्ज ,

२) मध्यम मुदत कर्ज,

३) दिर्घ मुदत कर्ज,

४) ठराविक मुदत कर्ज

५) मध्यंतरीय कर्ज,

६) रोख व कमाल पतिवरील (कॅश व अधिकतम क्रेडीट)कर्ज

७) मौल्यवान वस्तु शासन पुरस्कृत आर्थिक हमी प्रमाणपत्रे,सरकारी अगर विश्वस्त कर्जरोखे अगर /आणि शेतकी माल खते,अवजारे आणि औद्योगिक अगर ग्राहकी (उदीम) माल, शेती धान्य पिके,वेअर हाऊस पावत्या,बँकेच्या कायम ठेव पावत्या यांच्या तारणा वरील (प्लेज) आणि/अगर नजरगहाणावरील कर्ज (हायपॉथीकेशन) (ओव्हरड्राप्ट)

८) सहभाग योजनेअंतर्गत कर्जपुरवठा/निधीची गुंतवणूक करणे.

९) तात्पुरते कर्ज.

१०) नाबार्ड पुरस्कृत नॉन फॉर्म सेक्टर व इतर कारणासाठी कर्जपुरवठा,

११) छोटया उद्योजकांना, नवीन उद्योजकांना नाममात्र सभासद करुन घेवून औद्योगिक कारणासाठी बँकेस स्थावर अगर जंगम मालमत्तेच्या तारणावर त्यांना थेट पध्दतीने कर्जपुरवठा करता येईल.अशा प्रकारचा कर्जपुरवठा तारणावर त्यांना थेट पध्दतीने कर्जपुरवठा करता येईल. अशा प्रकारचा कर्ज पुरवठा नाबार्डच्या सूचनेप्रमाणे केला जाईल.

१२) पगारदार नोकरांना त्यांचे पगारावर, स्थावर आणि जंगम मालमत्तेच्या तारणावर त्यांना नाममात्र सभासद करुन घेवून वैयक्तिक कर्जपुरवठा करता येईल.

१३) स्वयं सहायता गटांना थेट अगर विविध कार्यकारी सहकारी सोसायटया मार्फत कर्ज पुरवठा करता येईल.

वरील पोटनियमात काही नमूद असले तरी नाबार्डचे पूर्वपरवानगीने विशिष्ट परिस्थितीमध्ये विशिष्ट कर्ज पुरवता येईल वर दर्शविलेल्या कर्जावरील व्याजाचे दर बँक वेळोवेळी ठरवील. मात्र कर्जाच्या थकीत रक्कमेवर ठरलेल्या व्याजाच्या दरापेक्षा जास्तीत जास्त २% दंडव्याज किंवा या संबंधी रिझर्व्ह बँक किंवा नाबार्ड यांच्याकडून कळविलेल्या दराने दंडव्याज आकारले जाईल.

**(५३)** विशेष परिस्थितीत कर्ज परतफेडीस कर्ज कालावधीत जास्तीत जास्त तीन महिन्याची मुदतवाढ देण्याचा / कर्ज हप्त्यांची पुनर्रचना करण्याचा अधिकार बँकेस राहील.

**(५४)** जर एखाद्या संलग्न संस्थेने अगर/आणि एखाद्या कर्जदाराने व्याज आणि मुद्दलाच्या परतफेडीच्या हप्त्याची सर्व रक्कम मुदतीत भरली नाही तर कर्जाच्या अटी काहीही असल्या तरी दिलेले सर्व कर्ज व्याजासह परतफेड करण्यास ताबडतोब पात्र होईल.

**(५५)** बँकेच्या कोणत्याही सभासदाचे सभासदत्व काढून टाकल्यामुळे अगर / आणि कोणत्याही कारणामुळे,सभासदत्व नष्ट झाल्यास कर्ज अगर कॅश-क्रेडीट देतेवेळी काहीही अटी असल्या तरी अशा सभासदाकडून येणे असलेली सर्व बाकी व्याजासह ताबडतोब वसूल करण्याचा अधिकार राहील.

## १७.वैयक्तिक सभासदांना कर्ज

**(५६)** वैयक्तिक सभासद आणि नाममात्र सभासद यांना द्यावयाचे कर्ज रिझर्व्ह बँक व नाबार्ड यांच्या मार्गदर्शक सुचना व त्यांनी घालून दिलेल्या अटी व मर्यादा यावर अवलंबून राहील.

**(५७)** बँकेचे व्यक्ती सभासद / नाममात्र सभासद बँकेचे संचालक मंडळ ठरवील त्या धोरणानुसार बँकेकडून कर्ज मिळण्यास पात्र राहतील.

**(५८)** **अ.** बँकेला वैयक्तिक सभासदांना आणि पोटनियम नं.११ अन्वये दाखल करुन घेतलेल्या नाममात्र सभासदांना खालीलप्रमाणे कर्जपुरवठा करता येईल:-

१) सोने व चांदी यांच्या दागिन्यांच्या तारणावर २) शासन पुरस्कृत आर्थिक हमी प्रमाणपत्रे,(नॅशनल सेव्हिंग्ज सर्टीफिकेटस्),सरकारी आणि इतर ट्रस्टी सिक्युरिटीज व

बँकेच्या मुदतीच्या ठेवी यांच्या तारणावर ३) शेती व औद्योगिक मालाच्या तारणावर ४) सेंट्रल वेअर हौसिंग कार्पोरेशन अगर महाराष्ट्र स्टेट वेअर हौसिंग कार्पोरेशन यांनी आदा केलेल्या गुदाम पावत्या यांच्या तारणावर, ५) नाबार्ड व रिझर्व्ह बँक यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार बँकेचे संचालक मंडळ वेळोवेळी ठरवील त्या धोरणानुसार इतर कारणांसाठी

**(ब)**

१) कारणवार कर्जाची मर्यादा नाबार्ड व रिझर्व्ह बँक यांच्या सूचनेनुसार राहील.

२) अर्जदाराने खालील प्रमाणे प्रतिज्ञापत्र लिहून दिले पाहिजे,....

अ) दोन पेक्षा जास्त अपत्ये होवू दिली जाणार नाहीत अगर ज्या अर्जदारांना दोन पेक्षा जास्त मुले आहेत त्यांनी असलेल्या अपत्यापेक्षा अधिक अपत्ये होणार नाहीत.

ब) प्रतिज्ञापत्राचा भंग झाल्याचे निदर्शनास आल्यास सर्व कर्ज वसुलीस पात्र होईल

क) प्रत्येक प्रकारच्या कर्जावरील व्याजाचे दर बँकेस वेळोवेळी ठरवता येतील.

ड). व्यक्तींना द्यावयाचे कर्जातील एकूण गुंतवणूक ही बँकेच्या एकूण टाइम ॲन्ड डिमांड लायबिलीटीच्या ठरविण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असणार नाही.

## १८. जिल्हा परिषद,स्थानिक स्वराज्य संस्था व इतर संस्था

इ. इतर पोटनियमात काही नमूद असले तरी जिल्हा परिषदेला/स्थानिक स्वराज्य संस्थेला तारणावर किंवा तारणाशिवाय ओव्हरड्राफ्ट मंजूर करता येईल.

ई. बिनसरकारी खाजगी दुय्यम शाळांना (त्यात स्थानिक मंडळाकडून चालविलेल्या संस्थांचा समावेश आहे) की ज्यांना सरकारी ग्रँट मिळते अशांना त्या संस्थेतील शिक्षक व इतर कर्मचा-यांना पगार देण्यासाठी सरकारी रोख्याचे तारणावर अथवा बिनतारणावर अथवा सरकारी हमीवर बँकेचे संचालक मंडळ वेळोवेळी ठरवील त्या रक्कमेपावेतो तारण कर्ज संचालक मंडळ देवू शकेल अथवा संस्थांचे प्रमुख व संचालक मंडळाचे संमतीने जसे ठरवील त्याप्रमाणे तारण कर्ज देता येईल. जर संस्थांना सरकारी रोख्यावर तारण कर्ज मंजूर व्हायचे असेल तर अशा वेळी सरकारी हमीची गरज नाही. कर्जमर्यादा या संस्थांचे तारण कर्जासाठी लागू राहणार नाही.

## १९. ठेवी

**(५९)** अ) बँकेस कायम,बचत,चालू आणि मागणी (कॉल) इत्यादी प्रकारच्या ठेवी बँकेने तत्संबंधी केलेल्या नियमानुसार स्विकारता येतील.

## २०. वार्षिक पत्रके

**(६०)** महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियम/नाबार्ड/रिझर्व्ह बँक यांनी ठरवून दिलेल्या नमुन्यात वार्षिक पत्रके तयार करतील.

## २१.नफा-वाटप

**(६१)** ३१ मार्चला संपलेल्या वर्षातील ढोबळ नफ्यातून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ६५ व ६८ व त्याखालील नियम क्र.४९ ए,५१,५३ ए यामधील तरतूदीनुसार सर्व बाबींची वजावट झाल्यानंतर उरलेली रक्कम त्या वर्षा अखेरचा निव्वळ नफा म्हणून समजला जाईल.

**(६२) बँकेच्या निव्वळ नफ्यापैकी निदान २५ टक्के रक्कम गंगाजळीस जमा दिली जाईल. शिल्लक राहिलेल्या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणे करण्यात येईल :-**

१) दि महाराष्ट्र को-ऑप.सोसायटीज ॲक्ट १९६० मधील तरतूदीस पात्र राहुन वसूल भाग भांडवलावर लाभांश देणे. लगतच्या ३१ मार्च रोजी आपण धारण केलेल्या भागांवर ३१ मार्च रोजी संपलेल्या सालाचा भाग धारण केलेल्या मुदतीकरता लाभांश मिळण्यास सभासद पात्र राहील.

२) वरील बाबींच्या तरतूदीनंतर उरलेल्या नफ्याचा विनियोग (मागील वर्षाच्या शिल्लक नफ्यासह असल्यास) खालील प्रमाणे करता येईल :-

(२) अ) निव्वळ नफ्याच्या २० टक्केपेक्षा जास्त नाही इतकी रक्कम सार्वजनिक कारणाकरिता (धर्मादाय निधी) राखून ठेवणे व अशा रक्कमेचा विनियोग सहकारी कायदा व नियम/नाबार्डच्या मार्गदर्शक सुचनांनुसार करणे.

(अ) १) निव्वळ नफ्याच्या १० टक्केपेक्षा जास्त नाही इतकी रक्कम महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० खालील नियम १९६१ मधील नियम क्रमांक ५०, त्यात नमूद असलेल्या कारणाकरिता आर्थिक सहाय्य देण्यासाठी राखून ठेवणे.

(ब) इमारत निधी,लाभांश समकरण निधी व संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार इतर निधीकरिता रक्कम जमा देणे.

**(६३)** बँकेच्या साधारण सभेने लाभांश जाहीर केल्याच्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत भागावरील लाभांश वैयक्तीक सभासद घेवून न गेल्यास,अशा लाभांशावरील त्या सभासदाचे सर्व हक्क नष्ट होतील मात्र सभासदाने लेखी सूचना दिल्यास सदर रक्कम त्यांचे ठेव/कर्ज खात्यावर जमा दिली जाईल.लाभांशाची शिल्लक राहिलेली रक्कम बँकेच्या गंगाजळीस रीतसर जमा दिली जाईल.

**(६४)** महाराष्ट्र राज्य सरकारने,महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या भाग भांडवलावरील शिखर बँकेने मान्य केलेल्या लाभांशाच्या दरापेक्षा जास्त दराने रक्कम उपलब्ध झाल्यास अशा रक्कमेचा विनियोग सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांनी घालून दिलेल्या नियमानुसार केला जाईल.

## २२. गंगाजळी

**(६५)** बँकेच्या गंगाजळीत खालील रक्कमा समाविष्ट राहतील :-

१) पोटनियम ६३ अन्वये दर सालच्या निव्वळ नफ्यापैकी २५ टक्क्यांप्रमाणे जमा केलेली रक्कम.

२) नफ्यापैकी अगर अन्य मार्गाने त्यात जमा दिलेली रक्कम.

३) जप्त झालेल्या सर्व बँक भागाची वसूल झालेली रक्कम व मुदतीबाहेर गेलेल्या लाभांशाची रक्कम

४) पोटनियम क्र.१३ (ब) अन्वये जमा झालेल्या प्रवेश शुल्काची रक्कम.तीन वर्षपावेतो जिच्यावर कोणी हक्क सिध्द केला नाही अशी बँकेच्या व्यवहारात शिलकेत आलेल्या बाबींची रक्कम.

## २३. प्रॉव्हिंडंट फंड

**(६६)** बँकेस बँकेच्या सेवकांकरिता प्रॉव्हिडंट फंड निर्माण करता येईल. सदर निधीत सेवकांची मासिक वर्गणी जमा होईल. बँक वेळोवेळी ठरवील त्या दराने प्रॉव्हिडंट फंड कायद्याच्या तरतूदीस पात्र राहून सदर निधीत बँकेस भर घालता येईल. प्रॉव्हिडंट फंडाची रक्कम प्रॉव्हिडंट फंड ॲक्ट प्रमाणे गुंतविली जाईल.

## २४ निंबंधकाकडे सादर करावयाची विवरणपत्रे :

आर्थिक वर्ष संपल्यावर बँकेने सहा महिन्याच्या आत (३० सप्टेंबर ) मागील आर्थिक वर्षातील खालील व्यवहारांची विवरणपत्रके निबंधकाकडे दाखल करणे बंधनकारक आहे.-

अ. संस्थेच्या कार्याची माहिती (कामकाजाचा वार्षिक अहवाल)

ब. लेखापरिक्षण अहवाल

क. नफा वाटणी

ड. उपविधी दुरुस्ती

इ. वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख किंवा निवडणूका असल्यास त्याची तारीख

ई. निबंधकाने कायदा / नियम / पोटनियमास अनुसरुन विचारलेली माहिती.

फ. लेखापरीक्षक नियुक्ती व त्याची संमती.

## २५ तक्रार निवारण समिती -

बँकेचे सभासदांमधील तसेच सभासद व संस्थेमधील बँकेच्या कारभाराशी व व्यवस्थापना संबंधीत गा-हाणी, वाद, तक्रारी सोडविण्यासाठी बँक स्तरावर वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये तक्रार निवारण समितीची नेमणूक करण्यात येईल.

**तक्रार निवारण समितीची रचना खालीलप्रमाणे असेल -**

१. सदर समिती त्रिसदस्यीय राहील. (क्रियाशील सभासदांमधून) यातील एक व्यक्ती ही अध्यक्ष व अन्य दोन व्यक्ती समितीचे सदस्य म्हणून काम करतील.

समितीचे अध्यक्ष हे बँकेचे वरिष्ठ सभासद व बँकेच्या कामकाजाचे ज्ञान असलेले असावे. तसेच समितीचे उर्वरित दोन सदस्य हे बँकिंग विषयातले तज्ञ असावेत किंवा जिल्हा बँकेच्या कामकाजाबाबत अनुभवी सभासद असावा.

२. बँकेचा एक वरिष्ठ अधिकारी, समितीचा सचिव म्हणून काम पाहील व समितीच्या कामकाजची नोंद ठेवण्याचे काम तो करेल.

समितीचा कालावधी १ वर्षाचा राहील.

**कार्यव्याप्ती :-** सदर समिती बँकेच्या सभासदांमधील किंवा सभासद व संस्थेमधील बँकेच्या कारभाराशी व व्यवस्थापनासंदर्भातील गा-हाण, वाद किंवा तक्रारी यांचे निवारण करेल. प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने संबंधितास सुनावणी देवून व संबंधितांचे म्हणणे ऐकूण घेवून तीन महिन्यांच्या आत तक्रारीचे निराकरण करणे आवश्यक राहील सदर समितीची कर्तव्य म्हणजे त्यांच्यासमोर आलेल्या वादामध्ये संस्थेस योग्य तो सल्ला देण्याबरोबरच कायदा / नियम, संस्थेचे उपविधी व सहकार खात्याचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच उपविधी व सहकार खातयाचे आदेश व मार्गदर्शक तत्वे तसेच संस्था आणि सहकार क्षेत्रातील रुढी यांचा विचार करुन सभासद व संस्था यांचेमध्ये तडजोड घडवून आणणे. सदर समितीने समिती गठीत झाल्याचा अहवाल निबंधकाकडे सादर करावयाचा आहे.

## २६. सहकार प्रशिक्षण :-

अ. बँकेच्या सभासद, संचालक, अधिकारी - कर्मचारी यांना सहकार विषयक आणि संस्थेच्या व्यवहाराविषयक प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक वर्षी बँक अशा प्रशिक्षणासाठी आराखडा तयार करेल त्यामध्ये बँकेचे संचालक, सभासद अधिकारी कर्मचारी यांच्या प्रशिक्षणाचा समावेश असेल. त्या अनुषंगाने बँकेने प्रशिक्षणासाठी अंदाजपत्रकामध्ये तरतूद करावयाची आहे.

ब. बँक शासनाने अधिसूचित केलेल्या राज्य संघीय संस्थांच्या किंवा राज्य शिखर प्रशिक्षण संस्थांच्या शिक्षण व प्रशिक्षण निधीमध्ये विहित करण्यात येईल. अशादराने दरवर्षी अंशदान करील.

क. सदरचे प्रशिक्षण हे संघीय संस्था / राज्य शासनाने अधिसूचित केलेली शिखर प्रशिक्षण संस्था / रिझहर्व्ह बँक/नाबार्ड / यशदा / वैकुंठ मेहता इन्स्टिटयुट ऑफ को.ऑप.मॅनेजमेंट या संस्थांच्या माध्यमातून घेता येईल.

## २७. सर्वसाधारण

**(६७)** बँकेच्या संलग्न असलेल्या प्रत्येक संस्थेस व प्रत्येक भागधारकास बँकेच्या पोटनियमाची एक प्रत मिळेल. ठेवीदार व अन्य व्यक्ती यांना शंभर रुपायास एक  या प्रमाणे बँकेच्या पोटनियमांच्या प्रती मिळू शकतील.

**(६८)** बँकेच्या संचालक मंडळाच्या निर्णयानुसार बँकेवर बोजा अगर जबाबदारी निर्माण करणा-या प्रत्येक दस्तऐवजावर संचालक मंडळाने प्राधिकृत केलेल्या किमान दोन अधिका-यांच्या सहया असतील व बँकेची अधिकृत मुद्रा असेल.

**(६९)** बँकेच्या संचालक मंडळाने प्राधिकृत केलेल्या अधिका-यापैकी कोणाही दोघांस बँकेतर्फे चेकवर सहया करण्याचे,ड्राफ्ट व हुंडी काढण्याचे व ठेवीच्या पावत्या बँकेतर्फे देण्याचे अधिकार,त्याचप्रमाणे  कोणत्याही एका अधिका-यास हुंडी,बँक बिले व पावत्यांवर बँकेतर्फे सहया करण्याचे अधिकार बँकेस देता येतील.

**(७०)** (अ) बॅकेच्या शाखेकडील कोणत्याही दोन सेवकांस (संयुक्तरित्या) चेक्स,ड्राफ्टस्,हुंडीज व ठेवीच्या पावत्यांवर सहया करण्याचे अधिकार राहतील.

(ब) ज्या शाखांचे कामकाज कोणाही एक सेवक पाहत असेल तर त्या एका सेवकास चेक्स,ड्राफ्टस्,हुंडीज व ठेवीच्या पावत्यांवर सहया करण्याचे अधिकार राहतील.

**(७१)** बँकेच्या व बँकेस संलग्न असलेल्या संस्थेच्या पोटनियमांत विसंगती निर्माण झाल्यास  बँकेचे पोटनियम निर्णयात्मक असतील.

**(७२)** महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० व त्याखालील  नियम, रिझर्व्ह /नाबार्ड यांचे धोरणात्मक सुचनास पात्र राहून बँकेचे पोटनियम दुरुस्त करता येतील, कमी करता येतील अगर नवीन पोटनियमांचा त्यात समावेश करता येईल. मात्र  याकरता बँकेच्या सभासदांना सभेपूर्वी  किमान **१४** दिवसांची पूर्वसूचना (नोटीस)  द्यावी लागेल.महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० मधील कलम १३ अन्वये आवश्यक ती नोंदणी झाल्यापासून पोटनियमातील सूचित बदल अंमलात येतील.

**(७३)** बँकेचे पोटनियम यातील बदलासंबधी ३१ मार्चपर्यंत दाखल झालेल्या सूचना लगतच्या वार्षिक साधारण सभेपुढे ठेवल्या जातील. मात्र सदर सूचना वार्षिक साधारण सभपुढे ठेवणे अगर न ठेवणे ही बँकेच्या संचालक मंडळाच्या अखत्यारीतील बाब राहील.

**(७४)** बँकेच्या साधारण सभेने घेतलेल्या कोणताही निर्णय घेतल्यापासून सहा महिन्यात साधारण सभेपुढे फेरविचारासाठी ठेवता येणार नाही. मात्र साधारण सभेच्या विषय-पत्रिकेत अशा विषयाचा समावेश असल्यास व साधारण सभेस हजर असलेल्या सभासदापैकी २/३ सभासदांची मान्यता असल्यास अगर  सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य यांनी तसा आदेश दिल्यास,सहा महिन्यातील निर्णयाचा  फेरविचार बँकेच्या साधारण सभेत होवू शकेल.

**(७५)** बँकेच्या पोटनियमांच्या अन्वयार्थाच्या ज्या वादासंबंधी महाराष्ट्र सहकारी संस्थांचा कायदा १९६० मधील कलम ९१ अन्वये लवाद होवू शकत नाही अशा वादाबाबत सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य निर्णय देतील.

(७६) बँकेच्या पोटनियमांत कोणत्याही सभासदास अगर व्यक्तीस लेखी पूर्वसूचना(नोटीस) देण्यासंबंधी तरतूद असल्यास बँकेकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यावर संबंधीत सभासदास अगर व्यक्तीस अशी लेखी पूर्वसूचना टपालाने पाठविल्यास,पोटनियमाप्रमाणे पुरेशी सूचना दिली असे समजण्यात येईल.

(७७) बँकेच्या वतीने व करिता, बँकेचे सर्व कर्मचारी यांचा नेमणूक अधिकारी (Employer) म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी काम पाहतील.

(७८) बँकेच्या वतीने व करिता शाखेतील सर्व कर्मचा-यांचा नेमणूक अधिकारी (Employer) म्हणून शाखा-प्रमुख काम पाहतील.

(७९) महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.,रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया तसेच राष्ट्रीय कृषि व ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) या बँकांकडून केली जाणारी बँकेची सर्वसाधारण देखरेख व तपासणी याकरिता बँकेच्या संचालक मंडळाकडून तसेच सेवकांकडून आवश्यक ते संपूर्ण सहाय्य दिले जाईल व त्याच प्रमाणे हया बँकांनी ठरवून दिलेल्या नमून्यामध्ये मागितलेली सर्व माहिती,पत्रके,तक्ते इत्यादी वेळचे वेळी पाठविली जाईल.

(८०) बँकेचे मा.संचालक मंडळ बँकेच्या मालकीच्या वाहनाचे वापरासंबंधी नियम तयार करील.